“आपले मंडळ”

|| *Maharashtra Mandal of Detroit* ||



# स्नेहबंध





September 2021

Avinash, Hema, Ruchi, Akash and Adarsh Rachmale



# The N. Rachmale Foundation

## Prosperity Through Service

Avinash and Hema Rachmale

SKY Group Inc.

Sky Group Grand, LLC.
Real Estate Group

LAKESHORE HEALTHCARE GROUP LHG

Lakeshore Healthcare Group, Inc.
Nursing Home & Managed Care

LAKESHORE GLOBAL

Lakeshore Global
Infrastructure Contractors

www.therachmalefoundation.org | www.Lgccorp.com

# स्नेहबंध

## अनुक्रमणिका


| | | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | अध्यक्षीय | मंजिरी जोशी | ५ |
| 2 | पुनःश्च हरि ॐ | संपादक | ७ |
| 3 | वैदेही डोंगरे: मिस इंडिया – यु. एस. ए. | ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर | ८ |
| 4 | स्वप्नपूर्ती | सतीश लिंगमपल्ले | १० |
| 5 | कोव्हीड वॉरिअर - हेमा राचमाले | अंजली अंतुरकर | १३ |
| 6 | मिशिगनच्या समृद्धीसाठी | श्री ठाणेदार | १४ |
| 7 | प्रेम करावं | संजय मेहेंदळे | १७ |
| 8 | मी ॲपलेशिअन ट्रेलकडून काय शिकलो | नितीन अंतुरकर | १८ |
| 9 | मानसीचा चित्रकार तो | सरोज स्नेहल-सुरेश गोवेकर | २२ |
| 10 | सफर आधुनिक (मॉडर्न) भारताची | प्रदीप नाईक | २६ |
| 11 | दोन डोळे | निरंजन हुंबड | २८ |
| 12 | ट्रॉय मराठी शाळा | पार्थ देशमुख, भुवी नारखेडे | २९ |
| 13 | घरबसल्या | संजय मेहेंदळे | ३१ |
| 14 | वकिलाचं कार्ट | बाळकृष्ण पाडळकर | ३४ |
| 15 | डिप्रेशन | डॉ. वर्षा रेवणकर | ३६ |
| 16 | सर्वदेव नमस्कारम् केशवं प्रतिगच्छति | भारती मेहेंदळे | ३८ |





**संपादक:** ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर | संजय मेहेंदळे

**रचना व मांडणी:** भारती मेहेंदळे

**चित्र रेखाटन:** मृणाल देशपांडे

**मुखपृष्ठ:** मानसी डहाणूकर


लेखकांना, चित्रकारांना आणि वाचकांना
संपूर्ण मतस्वातंत्र्य देण्यात आले देण्यात आले आहे. लेखांतून व चित्रांतून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक किंवा आपण सहमत असूच असे नाही, तेंव्हा आपण हा अंक केवळ "मनोरंजनासाठी" आहे अशी अपेक्षा ठेवून वाचावा, ही विनंती!

# विघ्नहर्ता 2021



वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटि समप्रभ
निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा !!

It has been a whirlwind of a year and we meet again indoors for our first in person gathering after Sankrant in 2020. True to his name विघ्नहर्ता, Bappa rescued us and got us the venue we all wanted !

Last year we were in a virtual setting with the threat of the virus still lurking around us and looking for avenues to emerge out of the misery. This year has been one of hope, with vaccines and masks paving a path to safe gatherings.

MMDians have been active and it is indeed a great feeling to see our own, shining a light in our community.

I want to begin with the humanitarian efforts of our own Hema Rachmale, always there to lend a helping hand to anyone in need. Not only helping members in our community but reaching across organizations and partnering with many to get things done.

Our Marathi Shala led by Prajakta Ketkar and Deepak Kulkarni & Deepa Ingle, coordinators for Troy and Canton respectively, has continued online this past year in spite of the pandemic with a dedicated teaching staff, working with close to 150 students with 2 students successfully graduating from 5th grade! Our sincere thanks to all the teachers.

What can I say about the adventurous spirit of Nitin Anturkar! While we will contemplate on which safe setting we can be in, he chose the Appalachian Trail! A treacherous trail needs a courageous spirit, countless nights alone on a path of self discovery, Nitin has shared with us the many memories from his trek.

# स्नेहबंध

I am delighted to share another unique accomplishment of our MMD member, Vaidehi Dongre daughter of Manisha and Satish Dongre, who won the Miss India USA pageant in July. MMD is proud to have a Marathi girl from our youth community who has transcended all barriers to win a title she truly deserves. We wish her success for her upcoming Miss Worldwide contest and look forward to bringing the crown home.

MMD has always tried to branch out and enrich the community with our culture and talent. One such venture is the Dhol Tasha Pathak! Rejuvenated and revived under the thriving leadership of Pranav Aundhkar, our Pathak has been the talk of the Town. From performing under the MMD banner for local Non Profit events to an ultimate invitation for participating in the Independence Day parade at Time Square in New York!!

It has never been a MMD Ganpati without मोदक from Pinjarkar Kaku! The grace and joy she showed when I called her letting her know बाप्पा was calling her was so fulfilling. Thank you Kaku for always supporting आपले मंडळ!

Snehabandh is reborn after a long gap. Thank you from the bottom of my heart to all our Sponsors for their continued support to MMD. Tireless efforts from Bharati Mehendale, Sanjay Mehendale, Jyotsna Diwadkar, Mrinalini Deshpande for her beautiful artworks and Mansi Dahanukar for her vibrant cover. I am truly grateful for the team that puts MMD first and help selflessly.

Moments of pride, moments to rejoice, moments to thank! It is a privilege to be at the helm of an organization so diverse in it's outreach and rich in a culture that we need to ensure thrives forever.

Thank you to all the Members in our community and to my executive committee for all your support, I am looking forward to connecting with you all in person!

**Manjiri Joshi**

President 2021,

Maharashtra Mandal of Detroit

गणपती बाप्पा मोरया !
मंगल मूर्ती मोरया !!



With
Best Compliments
from

Pradeep
Kokate

## पुनःश्च हरी ॐ



'अगं एवढी पैठणी नेसली आहेस, फोटोपुरती तरी ती तोंडावरची टापशी काढ...'

'आता माझ्या परत १०००० स्टेप्स व्हायला लागल्या हं..'

"भारतात जातोय पण पूर्वीसारखा उत्साह नाही वाटत यावेळेला. एक तर vaccine चा पुरावा ॲप मध्ये टाका वगैरे उच्छाद आहे शिवाय आता काका नाहीत, मावशी गेली आणि आईची तब्ब्येत कोविडमुळे खूप खराब झाली आहे... माझ्या पोटात गोळाच आलाय.. "

"Dude! मला जेवणापासून social distancing करायला हवं यार!"

" गुणवंत व्हा लसवंत व्हा! "

झंझावाती वादळं, पूर आणि युद्ध यांच्यापेक्षाही हानीकारक महामारीला, 'कोविड' नामक राक्षसाशी मुकाबला करून आपला समाजच काय तर अक्खे जग पुन्हा नव्याने जगण्याची उमेद शोधते आहे. ही उमेद कुठून मिळणार? उगवता सूर्य, निष्पर्ण झालेल्या झाडांना फुटणारी पालवी, उमलत्या कळ्या, आणि एकत्र येऊन खेळताना हसणारी मुलं... या सर्वांकडून. या जगात 'जे जे उन्नत उदात्त उत्तम आहे ते पुन्हा नव्याने आपल्याला खुणावते आहे. 'झूम'ची ओढणी दूर करून आपण सर्व आता बाहेरच्या जगात परत एकदा पाऊल टाकत आहोत, थोडं चाचपडत तर थोडं कुतूहलाने. कमावलं काय गमावलं काय यांचा हिशेब मांडत, कालचा पसारा आवरत उज्ज्वल उद्याची वाट पाहात आहोत.

आमचा 'स्नेहबंध' देखील त्याला अपवाद नाही. मार्च २०२० मध्ये 'पाडवा' आवृत्तीसाठी आम्ही लेखांची जमवाजमव केली. दीड वर्षांनी नव्या कलाकुसरीसह आपल्यापुढे हा अंक सादर करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. त्याचबरोबर पुढील अंकाबद्दलचा प्रस्ताव मांडायलादेखील! आणि तो म्हणजे 'नव्याने रुजताना'. आगामी अंकात आपल्या कोविड डायरीतील एक पान आम्हाला वाचायला मिळालं तर छान होईल. आपलं मंडळ हे एक मोठं कुटुंब आहे, एकमेकांची खुशाली कळायला हवी ना? म्हणूनच तर गणेशोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्र मंडळाने सर्व सभासदांना समक्ष आणि एकत्रित आणण्याचा प्रयत्न करण्याचे औचित्य दाखवले आहे. विघ्नहर्त्या गणरायाचा, त्याच्या नावाला साजेसा, कार्यक्रम ठेवला आहे.

हा 'शुभंकर' कोविडच्या विघ्नाचा नाश करून उर्वरित वर्ष मंडळाच्या सर्व कार्यक्रमांना शुभाशीर्वाद देईल अशीच कामना आपण बाळगूया.

**संपादक:**

ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर आणि संजय मेहेंदळे

# वैदेही डोंगरे: मिस इंडिया - यु.एस.ए.



शुक्रवार १६ जुलै २०२१ च्या रात्री वैदेही डोंगरे (ट्रॉय, मिशिगन) हिचे - कधीही न पाहिलेले - स्वप्न पुरे झाले आणि तिला 'मिस् इंडिया - यु. एस. ए.' हा किताब मिळाला. १९८० मध्ये वर्ल्डवाईड पॅजन्ट या संस्थेतर्फे न्यूयॉर्कमध्ये या सौन्दर्यस्पर्धेची सुरूवात झाली परंतू हा मान मिळवणारी ही पहिलीच मराठी मुलगी आहे. अत्यंत मनमिळाऊ आणि शुद्ध मराठी बोलणाऱ्या वैदेहीने 'युनिव्हर्सिटी ऑफ मिशीगन (International Studies major and Business minor)' मधून पदवी मिळवली आणि अर्थार्जनासोबत सामाजिक भान राखणाऱ्या उपक्रमांनाही सुरुवात केली. ती सध्या AWE Foundation या सेवादायी संस्थेत विनामूल्य काम करत आहे. 'अबला नव्हे या सबला' हे तत्व डोळ्यासमोर ठेवून स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी ही संस्था कार्यरत आहे. 'मिस मिशिगन' म्हणून निवडून आली तेव्हाच वैदेहीने ठरवले की स्पर्धेच्या मंचाद्वारे या संस्थेच्या कार्याची सर्वांना माहिती करून द्यायची.

संगीत, नृत्य आणि व्हायोलिन वादन या तिन्ही कलांत वैदेही पारंगत आहे. IFC तर्फे भरवलेल्या या सौन्दर्यस्पर्धेत शेवटच्या टप्प्यात 'घर मोरे परदेसिया' या गाण्यावर तिने केलेल्या कथक नृत्याने सर्व प्रेक्षकांना जिंकले. आई सौ. मनीषा डोंगरे तिची कथक गुरू आहे आणि वडील श्री. सतीश यांच्याकडून मेहनतीबरोबर गाण्याचाही वारसा तिच्या कडे चालत आला आहे. व्यायाम व शरीर संवर्धनासाठी तिला कोणत्याही बाहेरच्या ट्रेनरची गरज



भासली नाही, धाकटा भाऊ, विनीत याचे तिला मार्गदर्शन मिळाले. वेळ मिळेल तेंव्हा तिला वेगवेगळ्या देशात जाऊन निसर्गाच्या सान्निध्यात हिंडायला आवडते. ती सध्या न्यूझीलंडमधील एका कंपनीसाठी मिशिगन व कॅलिफोर्नियामधून काम करते. या नोकरींद्वारे तिला न्यूझीलंडला जाऊन तो देश आणि तिथला निसर्ग पाहायचा आहे. अनेक देश फिरून वैदेहीचे पाय जमिनीवर भक्कमपणे टेकलेले आहेत. लवकरच ती 'मिस इंडिया-वर्ल्ड' स्पर्धेत अमेरिकेचं प्रतिनिधीत्व करेल. पुढील वाटचालीसाठी तिला मन:पूर्वक शुभेच्छा!


**- ज्योत्स्ना माईणकर दिवाडकर**







FOR ALL YOUR MORTGAGE NEEDS
VM
VEMA MORTGAGE LLC
SEBASTIAN GEORGE
Mortgage Broker
Contact me for a free rate quote
1-877-800-VEMA (8362)
saaby74@vemamortgage.com
We are open 24 X 7, 365 days a year



# स्वप्नपूर्ती

**गजर (की गाजर)?**

तसं बघायला गेलं तर 'महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट'च्या ढोल-ताशा पथकाची पुन्हा स्थापना सुमारे दोन वर्षांपूर्वीची. प्रणव औंधकरने पुढाकार घेऊन पुन्हा स्थापन केलेल्या या पथकाने छोट्या-मोठ्या कार्यक्रमांप्रसंगी ढोल-ताशा वादन करून आपलं अस्तित्व दाखवायला सुरुवात केली. दरम्यान कोविडने हातपाय पसरताच आमच्या एकत्र येण्यावर बंधने जरूर आली, पण त्यामुळे आमच्यातली ऊर्मी मात्र तिळमात्रही कमी झाली नाही.

सुमारे तीन महिन्यांपूर्वी प्रणवने आम्हाला सांगितले की येत्या 15 ऑगस्ट आपले पथक टाइम्स स्क्वेअर न्यूयॉर्क येथे ढोल वादन करणार आहे. आम्हाला पहिल्यांदा वाटले की आपल्या पथकाने अधिक गांभीर्यपूर्वक सराव करावा म्हणून प्रणवने दाखवलेले हे 'गाजर' आहे. कारण न्यूयॉर्क ही अमेरिकेची आर्थिक राजधानी आणि टाइम्स स्क्वेअर हा तेथील सर्वात प्रसिद्ध आणि गजबजलेला भाग. तेथे वादन करण्यासाठी निमंत्रण येणे आणि तेही ऐतिहासिक ७५व्या भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त, ही फारच दुर्मिळ परंतु तेवढीच अभिमानाची ही गोष्ट होती. त्यासंबंधी होत असलेला ईमेल वरील पत्रव्यवहार प्रणवने दाखवला आणि आमच्या लक्षात आले की हे गाजर नव्हते आणि तसे प्रत्यक्ष 15 ऑगस्टला आम्ही केलेल्या अभूतपूर्व ढोलवादनाने पुढे सिद्धही झाले. तिरंग्याच्या साक्षीने तेथील प्रत्येक क्षण आम्ही बेभानपणे व आनंदाने ढोलवादनाच्या माध्यमातून जगलो. तत्पूर्वीच्या घडामोडींची क्षणचित्रे टिपण्यासाठी हा लेखन प्रपंच.

**अध्याय पहिला: आरंभ १**

महिन्यापूर्वी प्रणवने न्यूयॉर्क मधील सहभागाची खात्री देणारा मेल आल्याचे दाखवताच आमच्यात उत्साह संचारला. धिंता धिंता धिंता धिंता... तरीही मनाच्या एका कोपऱ्यात आपण स्वप्नात असून हे दिवास्वप्न तर नाही ना होणार, अशी भीती होतीच. आम्ही एरवी सराव जोमाने करायचोच. परंतु आता आमच्यासमोर एक प्रबळ ध्येय आणि आव्हान होते आणि त्या आव्हानाचा सक्षम-पणे सामना करून आमच्यातील सर्वोत्कृष्ट देण्याचा प्रयत्न करण्याशिवाय दुसरा तरणोपाय नव्हता. न्यूयॉर्क पर्यंतचा प्रवास, निवास, प्रत्यक्ष वादन आणि परतीचा प्रवास या सर्वांदरम्यान लागणाऱ्या विविध गोष्टींची जबाबदारी विविध व्यक्तींवर देण्यात आली. ही जबाबदारी प्रत्येकाने समर्थपणे सांभाळलीच, शिवाय प्रत्येक टप्प्यावर सर्वांची काळजी कशी घेतली जाईल हा विचार त्यामध्ये होता. आम्ही आमचा प्रवास येथून प्रारंभ केला. गणपती बाप्पा मोरया....!!

**अध्याय दुसरा: प्रवास (ट्रेन)**

हातात अतिशय कमी वेळ (धड धड धडक धडक...), आमच्या वादनात होणाऱ्या चुका आणि नसलेला ताल (मेळ)... तडक तडक... हे बघून प्रणवला वाटले की आता ही ट्रेन सुटणार पुन्हा एकदा.... सर्वांच्या मनात ऊर्जा भरून प्रॅक्टिसचे आठवड्यातील दिवस दोन वरून चार वर करण्यात आले आणि परिस्थिती परत नियंत्रणात येऊ लागली.



# स्नेहबंध

**अध्याय तिसरा: ताल**

खरं तर सुरुवातीला आमच्या ढोल, ताशा, झांजा, टोल यामध्ये मेळ नव्हता. प्रत्येकाचे स्वतंत्र जग निर्माण झाले होते. कुठूनही ही एक टीम वाटत नव्हती. पण फारसा वेळ उरलेला नाही हे लक्षात आल्यानंतर प्रत्येकाने आपल्यातल्या उणीवा शोधणे सुरू केले आणि बघता बघता एकसंघ वादन सर्वांच्या हातून घडू लागले! एखादे व्यावसायिक पथक वाटावे इतपत आम्ही प्रगती केली होती. अर्थात प्रणवची रागीट नजर, ओरडणे आणि फ्रस्ट्रेशन...! गुरुजी त्यांची भूमिका प्रामाणिकपणे पार पाडत होते. अतिशय कमी वेळात आम्हाला सर्वोत्कृष्ट सादरीकरणासाठी तयार करण्याचे प्रणवचे कौशल्य वाखाणण्यासारखे होते हेच खरे.

**अध्याय चौथा: हृदयस्पंदने (२१ बीट्स)**

डेट्रॉईट ते न्यूयॉर्क असा 1000 किलोमीटरचा तब्बल दहा तासांचा प्रवास एका खास बसने करत असताना मनात हुरहुर होतीच. अखेर 15 ऑगस्टचा सोनेरी दिवस उजाडला. सकाळी बरोबर सात वाजता आमची संपूर्ण टीम टाइम्स स्क्वेअर, न्यूयॉर्क येथे हजर झाली. ढोल, ताशा, झांजा, टोल यांची तयारी करेपर्यंत सव्वानऊ वाजले. आम्हाला वेळ दिली होती साडेनऊची. पण ही पंधरा मिनिटेदेखील आता आम्हाला पंधरा तासांसारखी भासू लागली. काउंटडाऊन सुरू झाला... १०, ९, ८...असे करत प्रणवने हात उंचावताच ताशा आणि लागोपाठ ढोल, झांजा, टोलच्या गजराने टाइम्स स्क्वेअर दणाणून गेला आणि महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईटने टाइम्स स्क्वेअर, न्यूयॉर्कवर एक नवीन इतिहास रचला.

**अध्याय पाचवा: भीमरूपी**

ताशाच्या पहिल्या तर्रीनंतर आमच्यातील प्रत्येकात साक्षात भगवान हनुमान अवतरले आणि यापूर्वी कधीही न जाणवणाऱ्या एका अनोख्या ऊर्जेचा प्रत्यय येऊ लागला. आमच्या वादनातून निघणाऱ्या बिट्समुळे टाइम्स स्क्वेअरवरील उत्तुंग इमारती थरथरत आहेत की काय असे वाटू लागले. "जय हनुमान" "जय श्रीराम"!

**अध्याय सहावा: शिवस्तुती**

शिवगर्जना दरम्यान झालेल्या ध्वजारोहण आणि राष्ट्रगीताने अमेरिकन भूमीवरही सर्वांच्या अंगावर अक्षरशः शहारे आले. त्यानंतर प्रणवने केलेल्या शिवगर्जननेने अवघं अवकाश व्यापून टाकलं. शिवगर्जना इतकी जोरात आणि सुस्पष्ट होती कुठल्याही ध्वनिक्षेपकाची प्रणवला गरजही भासली नाही. यानंतर इंद्रजिमी झांबर सादर करताना आम्ही एकमेकांच्या सूरात सूर मिसळले. आकाशातून साक्षात श्री छत्रपती शिवराय ही शिवस्तुती ऐकत असतील तर त्यांना आम्हा मावळ्यांचा प्रचंड अभिमान वाटला असेल हे निःसंशय! मराठी माणसाने टाइम्स स्क्वेअरवरसुद्धा भगवा फडकवला! जय भवानी! जय शिवाजी!!

**अध्याय सातवा: तांडव**


आमचे जोशपूर्ण वादन बघून उपस्थित प्रेक्षकांमध्येही उत्साह संचारला आणि त्यांनीही त्यावर ठेका धरून नाच करण्यास सुरुवात केली. हा प्रत्यक्ष श्री शिवशंकराने आम्हाला दिलेला आशीर्वादच होता असे वाटू लागले.

**अध्याय आठवा: आपण जिंकलो ! (वी विल रॉक यू!)**

टीममधल्या प्रत्येकाने समर्पित भावनेने सहभागी होऊन हे ढोलवादन यशस्वी केले. प्रत्येकाच्या मनात टाइम्स स्क्वेअरवरील क्षणाक्षणाची आठवण निरंतर राहील आणि सुखद अनुभूती निर्माण करेल हे नक्की. प्रणवसह खासकरून विजय पाचोरे, प्रशांत बडवाईक, अमित शाह, महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईटचे आणि सहभागी झालेल्या तमाम कलाकारांच्या परिवारांचेही मनस्वी आभार!

-- **सतीश लिंगम्पल्ले, MMDET Dhol Tasha Pathak**




KRISBI TRAVEL
NEW SITE NEW BRAND
SAME GREAT SERVICE
B2C TRAVEL PORTAL
WWW.EZTOFLY.COM
START FLYING THE EZ WAY
✓ One stop shop for all your Travel needs
✓ Custom Tour Packages
✓ Flights
✓ Cruises & much more...
Call Today for a
personalized service
Phone: 248-569-8668
Email: Detroit@krisbitravel.com

## Covid Warrior - Hema Rachmale

If you live in Detroit or in many parts of North America, the name Hema Rachmale needs no introduction. She is a proud mother, supportive spouse, an entrepreneur and equally a person who is always willing to help anyone in need.

Hema Rachmale took the challenge of supporting so many families and communities during this horrible COVID times. While the pandemic was devastating itself, it became an opportunity to support and help those who were most distressed. Hema with her characteristic ‘can do’ attitude and using her extensive network that included the local hospitals, public officials and even the consulate general of India and his staff at the Indian Consulate in Chicago and many others helped them. Her contribution to MMD, BMM, DIWA, Palav, and MICS allowed her to open multiple avenues for support. A few examples of her extensive support are illustrated as follows:

- Helping families to obtain visa who needed to depart quickly to be with their loved ones in India.
- Supporting stranded Indian students to return to India during the pandemic.
- Arranging to get the final remains of the departed to their destination back in India.
- Fundraising to provide Oxygen concentrators and ventilators to rural parts of Maharashtra.
- Recognizing her extensive work during the Pandemic, the National Council of Asian Indian Association and National India Hub recently honored her at a ceremony at the Capitol Building in Washington DC.

MMD is proud of you Hema!

- Anjali Anturkar





## मिशीगनच्या समृद्धीसाठी...

ऑगस्ट २०२० मधे सात अफ्रिकन अमेरिकन माझ्याविरुद्ध निवडणुकीत उभे होते. याच अफ्रिकन अमेरिकन लोकांची ९०% वस्ती असलेली हा एक मतदारसंघ आहे; जिथं भारतीय लोक जवळजवळ नाहीच आहेत. या प्रभागातून मी निवडून आलो. माझ्या जवळच्या प्रतिस्पर्ध्याला मी २०% ने हरवलं आणि त्यानंतर झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत मी ९३% मतं घेऊन जिंकलो; ते माझ्या रिपब्लिकन प्रतिस्पर्ध्याविरुद्ध. मलाबऱ्याच वर्षांपासून जे करायचं होतं; ते म्हणजे समाजसेवा. इतरांसाठी काहीतरी करायचं... आपण जे देणं लागतो या कर्मभूमीला; ते देणं परतफेड करायचा ध्यास मला लागला होता. जे मला करायचं होतं; ते मी करू शकलो... आणि आता ते करण्याची संधी मला लोकांनी दिली आहे. आणि खरोखरच मानण्यासारखं आहे की मी बाहेरचा दिसणारा माणूस, मी बोलतो वेगळं, मी दिसतो त्यांच्यापेक्षा वेगळा तरी त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवून मला निवडून दिलं. तर आणखी एक जबाबदारी वाढली माझी की त्यांच्यासाठी चांगलं काहीतरी करायचंय. कारण अमेरिकेमधे वर्णभेद आणि वंशभेद हा पिढ्यानपिढ्या चालत आला आहे; आणि त्यामुळं बऱ्याच पिढ्या विशेषतः डिट्रॉईटसारख्या मेट्रो एरियामधे ३०% लोकं दारिद्य रेषेच्या खाली आहे आणि ते पिढ्यानपिढ्या सामना करताहेत. फार कठीण जातं त्यांना. त्यांना संधी उपलब्ध नाहीयेत. ज्या संधी गोऱ्या समाजाला उपलब्ध आहेत; त्या बऱ्याचशा यांना मिळत नाही. याला एक कारण वंशभेद; जो अमेरिकेमधे पद्धतशीरपणे जोपासला गेला आहे. आणि अमेरिकेकडं सगळेजण पाहतात की एक बलाढ्य, श्रीमंत देश म्हणून पण या देशातसुद्धा इतक्या काही समस्या आहेत. इथं जर बघितलंत तर शाळा पहिलीपासून ते बारावीपर्यंतच्या ज्या शाळा आहेत त्या शाळांच्यामधेसुद्धा शैक्षणिक दर्जा, गुणवत्ता कमी आहे. तिथल्या शाळेच्या इमारती आहेत त्यात पाऊस बाहेर पडतो तेव्हा आत गळतं. वर्गांमध्ये गळतं. जेव्हा बाहेर बर्फ पडत असतो तेव्हा मुलं थंडीनं वर्गांमध्ये कुडकुडत बसतात. इतकी थंडी असते वर्गांमध्ये की कधीकधी मुलं दिवसभर थंडीचं जॅकेट घालून शाळेच्या तासांना बसतात. अशाही अडचणींचा सामना शाळांना करावा लागतो. शाळेत संगीत शिकवणारे शिक्षक आहेत त्यांच्याकडे वाद्यसंगीत शिकवण्यासाठी लागणारी वाद्यच नाहीयेत. कितीतरी वेळला शिक्षक स्वतःच्या खिशातले पैसे घालून शाळेसाठी काही वस्तू आणतात; आणि मुलांना वर्गांमध्ये जे काही शालोपयोगी सामान लागतं ते आणणं असं करतात. तरूण मुलांना पण बऱ्याचदा काही आशाच नसते. त्यामुळं मग थोडीफार गुन्हेगारी करणं किंवा इतर काहीतरी अशाच गोष्टींमध्ये वेळ जातो. त्यामुळं बरीचशी मुलं बालसुधारगृहात आहेत. मग ती बालसुधारगृहातून अठरा वर्षांची झाली की बाहेर पडतात. मग त्यांना काही मार्गदर्शन नसतं. त्यांच्याकडे कसलंही तांत्रिक शिक्षण नसतं. कितीतरी कुटुंबांमध्ये जो पुरूषवर्ग आहे तो बराचसा तुरुंगात असतो किंवा बरीचशी कुटुंबं, संसार दुभंगलेले आहेत. तर या मुलांना एक उज्वल भवितव्य द्यावं; त्यांनी एक स्वतंत्र व्यवसाय सुरू करावा, स्वतःच्या मालकीचा उदयोगधंदा सुरु करावा यासाठी त्यांना उत्तेजन देणं हे सर्व महत्त्वाचं आहे, आणि ते सगळं मला करायचंय...!

अमेरिकेत मानसिक आजार, मानसिक अस्वास्थ्य हासुद्धा एक फार मोठा प्रश्न आहे. कोव्हिडनंतर तर मानसिक अस्वास्थ्याचा प्रश्न खूपच वाढलाय. एक तर मनोरुग्णांसाठी सेवा खूप कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. त्याच्यामधे वाढ करावी, ती जास्त सुलभ करावी यासाठी मी काही विधेयकं आता माझ्या विधानसभेमधे आणतोय. त्याचप्रमाणे आता आम्ही शिक्षणक्षेत्रासाठी सतरा बिलियन डॉलरचं मोठं बजेट पास केलं. अशा कितीतरी गोष्टी मी करतोय. कारण याच्यातूनच या भागामधे काही सुधारणा होऊ शकेल. आणि मी हे सगळं कुणाचाही दबाव न घेता करू शकतो. म्हणजे असं की मी स्वतःचे पैसे खर्च करून माझी निवडणूक लढलोय. त्यामुळं निवडणुकीसाठी जे पैसे लागतात, खर्च होतात; त्यासाठी मी कुणावरही म्हणजे कुठल्या श्रीमंत लोकांच्यावरती आणि कशावरतीही मी अवलंबून नाहीये. त्यामुळं मी स्वतंत्रपणे निर्णय घेतो. जेव्हा मी विधानसभेमधे एखाद्या विधेयकावर मतदान करतो; तेव्हा त्या विधेयकाचा जो काही गाभा आहे त्याचा पूर्ण विचार करून मगच मी त्याला मत देतो; आणि मग कुठला इंटरेस्ट ग्रुप म्हणजे कुठली एक कंपनी, त्यांना काय हवंय किंवा कुणाला काय हवंय असा मी विचार करत नाही. माझ्या लोकांना जे काही योग्य आहे अशा रीतीनं मी मतदान करतो. आणि दुसरं म्हणजे माझ्या सद्सद्विवेकबुद्धीला जे पटेल तसंच मी मत करतो. आणि कुणाचा दबाव वा कुणी देणगीदार आहेत त्यांना खुश करण्यासाठी काही करण्याची मला कधी जरुरीच वाटत नाही. ११० लोकांची ही विधानसभा आहे. त्यातला मी एक सभासद आहे. आणि आमची जी विधानपरिषद आहे त्याला आम्ही सिनेट म्हणतो आणि विधानसभेला मी हाऊस म्हणतो आणि त्या विधानपरिषदेमधे ३८ जागा आहेत. दोन्हीकडं दुर्दैवानं काय झालं आहे की आमचा जो डेमोक्रेटिक पक्ष आहे तो अल्पमतात आहे. त्यामुळं आम्हाला इतक्या मोकळेपणाने काही करता येत नाही. आम्ही विरोधी पक्षामधे असल्यामुळं सत्ताधारी पक्षाशी बोलत आणि त्यांच्या संमतीनंच बऱ्याचशा गोष्टी कराव्या लागतात. सुदैवानं आमची जी गव्हर्नर आहे, जी या विधेयकावर सही करते तिला व्हेटो पॉवर आहे. जरी विधानसभेनं एखादं विधेयक मंजूर केलं तरीसुद्धा ती व्हेटो पॉवर वापरून त्याचा कायदा होण्यास प्रतिबंध करू शकते. तर तसं असल्यामुळं थोडासा फरक पडतो. आणि थोडं आम्हाला लेव्हरेज मिळतं कारण आमच्या पक्षाचा गव्हर्नर आहे म्हणून! ज्या गव्हर्नर पोझिशनसाठी मी लढलो होतो त्या जागेवर ग्रेचन व्हिटमर नावाच्या बाई निवडून आल्या. तर असं माझं गेले आठ महिने कामकाज चालू आहे. आणि मी एकही कमिटीची मिटिंग कधी चुकवली नाही. कधीही विधानसभेच्या कामकाजाचा दिवस मी कधी चुकवला नाही. एकही मतदान करायची संधी मी सोडली नाही. तेव्हा माझी उपस्थिती १००% आहे.




तर असा मी खूप प्रयत्न करून काम करतोय. आणि मला याच्यातून एक संधी मिळतीय काम करायची. याचबरोबर शिक्षणक्षेत्रात, मानसोपचार आणि आरोग्यसेवा संस्थांमध्ये खूप सुधारणा घडवून आणायच्या आहेत. तसंच छोट्या व्यवसायिकांना मदत करायची आहे. आता कोव्हिडमुळं लहान उद्योगधंदे करणाऱ्या व्यवसायिकांना खूप अडचणींना तोंड द्यावं लागत आहे. हे सगळं मी काम माझ्या सहकाऱ्यांच्या मदतीनं करतोय. नुसत्या डेमोक्रेटिक नाही तर रिपब्लिकन म्हणजे विरोधी पक्षाबरोबरसुद्धा. असे दोन्ही पक्ष मिळून आम्ही काम करतोय. त्यामुळं एक समाधान वाटतं. पूर्वी व्यवसाय करताना स्वतःसाठी आणि स्वतःच्या कुटुंबासाठी मी करत होतो. पैसे कमवत होतो. आता जो हा प्रकार आहे तो वेगळाच आहे म्हणजे इतरांसाठी काहीतरी करण्याची संधी मिळतीय हे एक विलक्षण समाधान आहे.

**- श्री ठाणेदार**
State Representative, Michigan District 3
shrithanedar@gmail.com

## With Best Compliments

## From

# Shri & Shashi Thanedar



# प्रेम करावं

कोणावरही प्रेम करावं, कसलंही नाव देऊ नये
कशावरही प्रेम करावं, कुठलंही नाव ठेवू नये.

जगण्यावर प्रेम करावं, जेवणावर प्रेम करावं
काही करतांना हात, आखडता मात्र घेऊ नये.

ऐकण्यावर प्रेम करावं, बघण्यावर प्रेम करावं
आवडल्यावर दाद देण्यास, मागे मात्र राहू नये.

वर्तमानावर प्रेम करावं, भविष्यावर प्रेम करावं
जुन्या आठवणींच्या फार, मागे मात्र धावू नये.

हसण्यावर प्रेम करावं, रडण्यावर प्रेम करावं
डोळ्यातलं पाणी, लपवायला मात्र जाऊ नये.

वचनावर प्रेम करावं, वाचण्यावर प्रेम करावं
दिला वाचला शब्द, विसरायला मात्र पाहू नये.

आज असण्यावर प्रेम करावं, उद्या नसण्यावर प्रेम करावं
पुढच्या जन्मावर मागचे ओझे, ओढून मात्र नेऊ नये.

- संजय मेहेंदळे

## मी ॲपलेशिअन ट्रेलकडून काय शिकलो?

ॲपलेशिअन ट्रेल ही २,२०० मैलांची पायवाट अमेरिकेच्या पूर्वेकडच्या १४ राज्यांमधल्या डोंगरांतून जाते. १० लाख फुटांचा चढउतार असलेली ही पायवाट चक्क बहुतेक देशांपेक्षाही लांबलचक आहे. ही पायवाट सलग ६-७ महिन्यात पार करण्याचा माझा प्रयत्न बऱ्याच निरनिराळ्या शारीरिक दुखापतींमुळे ह्या वर्षीतरी यशस्वी झाला नाही. पण मी जे काही ३३४ मैल चाललो, त्यात शिकलेल्या गोष्टींची ही गम्मत जम्मत!

**<u>माझे सगळे पूर्वगृह धुळीस मिळाले.</u>**

तुफान गरमी, चड्डीपासून पोटऱ्यांवर ठिबकणारं घामाचं पाणी, निरनिराळे चढउतार, पाठीवर घेतलेली २६-२७ पौंडांची बॅकपॅक आणि माझं दमलेलं शरीर घेऊन मी एकदाचा "५०१" नावाच्या शेल्टरला पोहोचलो. शेल्टर म्हणजे छत आणि तीन बाजूंनी बंद असलेलं लाकडी घर. ना तिथे संडासाची सोय, ना वीज, ना दिवा, ना पाणी! पण पावसा-वादळामध्ये त्यातल्या त्यात थोडी आश्रयाची जागा म्हणून त्याचा उपयोग. तिथे पोचल्या पोचल्या समोर दिसले ते सहा उघडबंब पुरुष. सगळ्यांचा गांजा ओढण्याचा भाता अगदी जोरात चालू होता. (सगळ्या प्रकारच्या ड्रग्सना गांजा हे मीच दिलेलं मुळमुळीत नाव, बरं का!) ह्यांचे अगदी इंचनइंच देह रंगीबेरंगी टॅटूने कोरलेले होते आणि बाजूलाच भसाड्या आवाजात जोरात रॉक म्युझिक चालू होतं.

हे सगळं मला नवीन होतं. मी शहारलो. आता हे काय माझ्या नशिबात आहे असा विचार मनात येऊन गेला. त्याचं काय आहे, डोंबिवलीच्या मध्यम वर्गात वाढलेला मी मनुष्य. अगदी सरळसोट मार्गाने झालेला माझा एकमार्गी प्रवास. गांजा तर जाऊच दे, पण २४ वर्षांपर्यंत दारूच्या थेंबालाही मी शिवलो नव्हतो. रॉक म्युझिक नाही, धांगडधिंगा नाही, मुलींशी बोलणं सुध्द्रा नाही. साला, अगदीच सरळसोट जिंदगानी होती. आज मात्र इथें मी माझा घामाने पिचपिचीत भिजलेला शर्ट बाजूला काढून त्यांच्यात चक्क गप्पा मारायला जाऊन बसलो होतो. माझ्या शरीराला येणारा घामाचा घाणेरडा वास, लांबलचक वाढलेली दाढी, केसाळ उघडबंब पोट, धुळीने माखलेलं शरीर, सगळंच एकदम त्यांच्यासारखं होतं! त्यामुळेच कदाचित त्यांनी मला त्यांच्यातलाच मानलं असावं. काही का असेना पण आम्ही वेगवेगळी रॉक म्युझिक, गांज्याचे प्रकार, ते एकमेकांना कुठे भेटले, त्यांचे ट्रेलविषयीचे अनुभव अशा इकडच्या तिकडच्या बऱ्याच गप्पा मारल्या. (गांजा प्यायच्या पहिल्यावहिल्या अनुभवाला मात्र मी नकार दिला.)




त्यांच्यापैकी एक जण मला म्हणाला की "माझे वडील धर्मोपदेशक आहेत आणि त्यामुळे मी अतिशय बंडखोर झालेलो आहे." मग रेनमॅनने (हे त्याचं खास ट्रेलवरचं टोपणनाव) त्याला एक अफाट गोष्ट सांगितली. तो म्हणाला, "बाबा रे, ऐक. तुला एक अतिशय फंटास्टिक आयडिया सांगतो. मी चक्क एकेका धर्मामध्ये एकेक वर्ष अगदी समरस होऊन जातो. प्रत्येक वर्षी त्या त्या धर्माची पुस्तक वाचतो, त्यांच्या देवळात / मशिदीत / चर्चमध्ये जातो, सगळी प्रवचनं ऐकतो. ध्यान लावतो. असे चक्क 12 वेगळे वेगळे धर्म मी बारा वर्षात पाळले आहेत. त्यामुळे आता मला कुठल्याच धर्माचं अवडंबर वाटत नाही, कुठल्याच धर्माचा मला त्रास होत नाही."

ओ माय गॉड! एका छोट्या साध्या वाक्यामधून ह्या भसाभसा गांजा पिणाऱ्या माणसाने माझ्यासारख्या सरळसोट माणसाला केव्हढा जबरदस्त धडा शिकवला! पूर्वग्रह घालवायचा काय साधा आणि सोपा मार्ग सांगितला! जरा विचार करा की मी पुढच्या वर्षी मुस्लिम व्हायचं, मग त्यानंतर ज्यू, मग बौद्ध, मग मॉर्मन वगैरे वगैरे!

एका फटक्यात ह्या धर्मांविषयीचे माझे सगळे पूर्वग्रह गायब होतील. एखाद्याची जात, कातडीचा रंग ह्यांविषयी पूर्वग्रह आहेत? मग त्या जातीच्या माणसांना मित्र बनवा. कुठल्याही पूर्वग्रहाचा स्वतः अनुभव घ्या आणि मग चट के फट! सगळ्या पूर्वगृहांना बाय बाय करा! अचानक मला जाणवलं की हा विचित्र मनुष्य देवाचा अगदी आवडता बंदा असावा! (हा लेख लिहिल्यानंतर मला कोणीतरी सांगितलं की स्वतः रामकृष्ण परमहंसांनी सुध्दा हीच पद्धत वापरून निरनिराळ्या धर्मांचा अभ्यास केला होता.)

**<u>मी भीतीला तडीपार केलंय.</u>**

मला आठवतंय! 8 फेब्रुवारीचा दिवस होता. अजून दोन महिने होते मला ट्रेलवर जायला! माझ्या दोन वर्षांपूर्वीच्या हृदयविकाराच्या झटक्यामुळे डॉक्टरने माझी Echo Stress Cardiogram Test करायची ठरवली. त्यात म्हणे मी धावताना आणि विश्रांती घेत असताना हृदय कसं चालतंय ते बघतात. टेस्टनंतर डॉक्टर म्हणाले, "नितीन, तुझ्या कुठल्याही रक्तवाहिनीत अडथळे नाहीत. पण एक मोठा प्रॉब्लेम आहे. तुझं Ejection Fraction फक्त ३५% आहे. म्हणजे प्रत्येक ठोक्याला हृदयातलं फक्त ३५% रक्त शरीरात जातंय. I am sorry. पण तुला अपॅलेशिअन ट्रेलचं स्वप्न विसरायला लागेल. आपल्याला खरं तर एक ऑपरेशन करायला लागणार आहे." मी मनातल्या मनात किंचाळत होतो, "साला, हा काय नवीन राडा आहे?" पण चेहऱ्यावरची माशीसुध्दा न हलवता मी डॉक्टरला म्हणालो, "डॉक्टर, पण मला व्यायाम करताना काही विचित्र जाणवत नाही." त्यांनी मग एक दुसरीच टेस्ट केली आणि त्यात त्यांना Ejection Fraction ४५% आहे असं लक्षात आलं. मी आता पुरताच गोंधळलो होतो. मनाने कधी नव्हे ती कच खाल्ली होती. ट्रेलवर कसं होणार ह्याची चिंता वाटायला लागली. तेंव्हा अंजली, म्हणजे माझी सर्वात जवळची मैत्रीण, mentor आणि अर्धांगिनी, मला म्हणाली, "नितीन, सर सलामत तो पगडी पचास हे खरं. पण जगात फारच कमी माणसं अशी स्वप्नं उराशी बाळगतात. तू हे तुझं स्वप्न ट्रेलवर जायच्या आधीच रद्द करू नकोस. तुझ्या दररोजच्या हालहवालीं वरून ठरव की आपण पुढे जायचं की प्रवास रद्द करायचा." त्या दिवशी अंजलीने माझ्या भीतीला खुल्लमखुल्ला ठेंगा दाखवला होता.  माझी भीती वाटण्याची यादी खूप मोठी होती. दोन वर्षांपुर्वी-सारखाच हृदयविकाराचा झटका आला तर काय करू? डावा गुडघा धातूचा आहे, तो तुटला तर काय करू? घोट्याच्या खालचे सगळे सांधे गाउटमुळे दुखतात. त्यांचं काय होईल? माझा उजवा हात ६०F तापमानाखाली बधिर होतो, तसं झालं तर? पेन्सिल्वेनिया मध्ये मोठमोठे प्रचंड दगड आहेत. तिथे पडून डोक्याला मार बसला तर? अमेरिकेतल्या छोट्याछोट्या गावातल्या लोकांनी माझ्यासारख्या भारतीय वंशाच्या माणसाला बघितलं नसणार. मग मला ते कसं वागवतील? दर १७ वर्षांनी Cicada हे किडे प्रचंड प्रमाणात जमिनीतून वर येतात. हेच ते वर्ष त्यांच्या जमिनीबाहेर येण्याचं. ते अंगावर चढले तर? १०-१० फुटाचे विषारी साप ह्या ट्रेलवर खूप आहेत. माझी भीती वाटण्याची यादी खूप मोठी होती. दोन वर्षांपुर्वी-सारखाच हृदयविकाराचा झटका आला तर काय करू? डावा गुडघा धातूचा आहे, तो तुटला तर काय करू? घोट्याच्या खालचे सगळे सांधे गाउटमुळे दुखतात. त्यांचं काय होईल? माझा उजवा हात ६०F तापमानाखाली बधिर होतो, तसं झालं तर? पेन्सिल्वेनिया मध्ये मोठमोठे प्रचंड दगड आहेत. तिथे पडून डोक्याला मार बसला तर? अमेरिकेतल्या छोट्याछोट्या गावातल्या लोकांनी माझ्यासारख्या भारतीय वंशाच्या माणसाला बघितलं नसणार. मग मला ते कसं वागवतील? दर १७ वर्षांनी Cicada हे किडे प्रचंड प्रमाणात जमिनीतून वर येतात. हेच ते वर्ष त्यांच्या जमिनीबाहेर येण्याचं. ते अंगावर चढले तर? १०-१० फुटाचे विषारी साप ह्या ट्रेलवर खूप आहेत. त्यांच्यावर पाय पडला तर? मधमाशी चावली तर, उंदरांनी शेल्टरमध्ये माझ्या पायाचा चावा घेतला तर, ticks चावून मी लुळा झालो तर? एक ना दोन, ही भली मोठी यादी होती भीती वाटण्याची. त्याशिवाय ट्रेलवरच्या गोष्टी होत्याच. वीज अंगावर पडली तर, वादळात झाड उन्मळलं तर, कळकळीची तहान लागली असताना पाणीच सापडलं नाही तर, पावसात पाया-खालचे दगड घसरडे झाले तर? ही सगळी भीती आता अगदी तडीपार झाली आहे. अक्षरशः चुकूनसुध्दा त्यांचा विचार मनात येत नाही. सगळी आई वडिलांची आणि देवाची कृपा! ह्यामुळे सर्वात मोठा झालेला फायदा म्हणजे अपॅलेशिअन ट्रेल नावाचं एक अतिशय सुंदर जग माझ्यासमोर उघडलं गेलं. अगदी अलिबाबाच्या गुहेसारखं. मग मी भलंमोठं केसाळ अस्वल उघड्या जंगलात अनिमिष डोळ्यांनी बघू शकलो. Rattle Snakeचं rattle होनाजी बाळाच्या अमर भूपाळीच्या तन्मयतेने ऐकू शकलो. बाकी सगळं जाऊ दे, मी चालताना खूप म्हणजे खूपच आनंदी राहू शकलो. आणखी एक मजा म्हणजे प्रत्येक क्षणाला वर्तमान काळात जगायला शिकलो.



# Happy Travelling

## . . .at the lowest price

Clickontours.com

*Holiday just a click away!*

ClickOnTours is a full-fledged travel agency dedicated to the comfort of travelers. Our offices are located in Canada, US, UK and India.

From most economical airfares, cost-effective and customized hotel bookings, business tours, world cruises, family holiday packages, to car rentals, we offer the finest feast of services for every travel need.

**Enjoy lowest airfare for business economy on any airline**

**Find the best cruise easily with the help of our experts**

**Lowest hotel room tariff within USA & across the world**

**Key features:**

- Cost-effective & customized airfares, hotel bookings, car rentals
- Lowest rates guaranteed
- Affordable world cruises (USA / Canada / UK / Australia / India)
- Exclusive vacation packages from Alaska to Auckland
- Worldwide service centers

For the best travel deals,
call us on **+14252562109** *OR*
contact us on **sales@clickontours.com**

**Toll-free 877 239 1312**

**नेणिवेच्या पलीकडल्या फार मोठ्या शक्तीची जाणीव झाली.**

कुसुमाग्रजांच्या कवितेमधला एक निळा ढग ह्या निरभ्र आकाशात क्षितिजापाशी रेंगाळत दिसू लागला. हळूहळू तो वाघासारखा गुरगुरू लागला. मग असेच आणखी ५-७ ढग गोळा झाले. मग त्यांची काळी-निळी छटा जंगलातल्या ताज्या हिरव्या रंगावर झाकाळायला लागली. ट्रेलवरच्या Pinecone Needles च्या सड्याचा सावळा तपकिरी रंग अजूनच गूढ वाटायला लागला. जणू काही तो निळा-सावळा रंग आकाशातून जंगलात आणि जंगलातून माझ्या मनात प्रतिबिंबित व्हायला लागला होता. आणि.. अचानक विजांचा लखखाट झाला, आकाशातून पाऊस सुरु झाला. कानाचे पडदे फाटतील की काय असं वाटणारा कडकडाट. अक्षरशः आकाशातून दशलक्ष धबधबे कोसळू लागले. आणि ते तुफान वारं! त्याला मी काय म्हणू? अवाढव्य झाडंसुदधा वेड्यासारखे झोके घेऊ लागली. हे झोके म्हणजे आनंदाने डोलणं नव्हतं. हा होता उन्मत्त बेभान नाच. आल्फ्रेड हिचकॉकच्या सिनेमात कसं दार बंद होताना "कुईई" असं आवाज करतं! अगदी तस्साच आवाज हजारो झाडं करू लागली. लाखो पानातून आकाशाला व्यापणारा गडगडाट (हो, ह्या आवाजाला सळसळाट म्हणता येणार नाही). उघडे हात आणि चेहऱ्यावर पावसाच्या असंख्य सुया बोचू लागल्या. अख्खी ट्रेलच कोकणातल्या नदीसारखी वाहू लागली. हे सगळं अतिशय घाबरवणारं होतं. मनाचं कोकरू थरथरत होतं. आणि ते अफाट सुंदर पण होतं. कसं सांगू? जंगलाचा हा सर्वात सुंदर असा अवतार होता. अचानक माझ्या मनाची वीज लखलखली. अचानक लक्षात आलं. वेद आणि उपनिषदांनी गायलेलं हेच ते तांडव नृत्य! तोच तो निळा सावळा शंकर नाचत होता आणि मी तोच नाच बघत जंगलाच्या अगदी मध्ये उभा होतो. त्या पावसात माझ्या डोळ्यातलं पाणी कुठे वाहून गेलं ते माझं मलाच कळलं नव्हतं.असे केव्हढे तरी वेगवेगळे अवतार मी जंगलात बघितले. नेणिवेपलीकडल्या कुठल्यातरी मोठ्या शक्तीच्या मी नक्कीच जवळ पोहोचलो होतो.

**मौन आणि शांतता अनुभवली.**

ट्रेलवर दिवसभरात एखाद्‌दुसरं कोणीतरी भेटायचं. आणि संध्याकाळी शेल्टरपाशी कोणाशी तरी तासभर गप्पा व्हायच्या. पण नाही तर मी दिवसाचे २२-२३ तास एकटाच असायचो. सकाळी पक्षांच्या कलकलाटाने जाग यायची. कधीतरी पटकन एखादी खारूताई वाळलेल्या पानांचा आवाज करत पळून जायची. कधीतरी रातकिडे किंवा cicadas त्यांच्या कर्णकर्कश आवाजाने अख्ख जंगल व्यापून टाकायचे. कधीतरी पावसाची रिपरिप आणि माझ्या श्वासांचा ताल एक होऊन माझ्याशी संगत करायचा. हाच तो जंगलातल्या शांततेचा आवाज. गोबऱ्या गालाच्या गोड बाळाला दृष्ट लागू नये म्हणून लावलेल्या तिटीसारखा. आणि हे सगळं कसं अनुभवायचं? बाकी सगळा कलकलाट बंद करायचा. गाणं नाही, मोबाईल नाही, पुस्तक नाही, काही काही नाही. रक्ताच्या प्रत्येक थेंबाला, प्रत्येक हाडाला, शरीरातल्या प्रत्येक पेशीला ही शांतता अनुभवू द्यायची. अगदी रोज, सगळेच्या सगळे ४५ दिवस अनुभवू द्यायची. प्राजक्ता पाडगावकरांच्याच भाषेत सांगायचं तर (फेसबुकचा ग्रुप: माझा मराठीचा बोल):

*"मौनात जे सौन्दर्य आहे, ते उपजत असे सृजन आहे. मौन हे केवळ काहीतरी अलंकारिक, काही करून बघावे असे किंवा एखादं नव्या छंदाचे साधन नसून मौन हे पुष्कळ आदिम आणि मूलभूत असे आहे. शांतता, म्हणजे आवाजाचा अभाव नसून, सर्व आवाजाचा एक उच्चतम बिंदु आहे.हयात एक आंतरिक लय आहे, एक सृष्टीशी तादात्म्य आहे आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे खोल असे काही असते त्याच बरोबर त्यात काही गूढ आणि स्वतःच्या आतले काही ढवळून काढण्याचे सामर्थ्य आहे."*



पुढच्या वर्षी परत एकदा स्वतःच्या आतलं काही तरी परत एकदा ढवळून काढायला हवं.

(हा माझ्याच मुळच्या इंग्रजी लेखाचा मीच मराठीत केलेला स्वैर अनुवाद. माझ्या ॲपलेशिअन ट्रेलच्या प्रवासाचे असे बरेच इंग्रजी लेख आणि इतर मराठी साहित्य तुम्हाला dadhionthetrail.com ह्या website वर वाचायला मिळतील.)

**नितीन अंतुरकर**

## मानसीचा चित्रकार तो !

(व्यक्तिचित्र)

मुंबईच्या फोर्ट भागातील "जहांगीर आर्ट गॅलरी" चा कलेच्या उपासकांनीं गजबजलेला तो प्रशस्त हॉल. एयरकंडिशन चा मस्त गार-गार वारा. त्यात देशीविदेशींसह गोऱ्या समूहात पारशी पाहुण्यांचा भरणा जास्त. ह्या सगळ्या चित्रवेड्या कलाप्रेमींच्या गराड्यात, आपल्या मॉडर्न आर्टचे किस्से, प्रत्येक चित्राची संकल्पना, मध्यवर्ती आशय समजावून सांगण्यात मग्न असलेला... एक धुंद, स्वच्छंद, मनमौजी, एक सच्चा, हाडाचा कलाकार... मूर्तिकार, छायाचित्रकार, चित्रकार आणि शिल्पकार - कै.जयराम वसंत गोवेकर... मानसीचा चित्रकार !

कोकणातल्या अथांग समुद्राशी एकनिष्ठ असलेला, सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या "मालवण" गावचा हा दर्यादिल सुपुत्र. नारळा-आंब्या-फणसाच्या बागांतून सुसाट धावत असलेल्या बेभान वाऱ्याप्रमाणेच कधी कुठल्याच सांसारिक किंवा व्यावहारिक चौकटीत, स्वतःला जखडून न ठेवता स्वतःच्या हिंमतीवर जगणारा... आपल्या अश्या एका वेगळयाच चित्रविश्वात रमणारा.. शिल्पकलेत आकंठ बुडलेला हा कलेचा पुजारी...... आपल्या लाल मातीशी इमान राखणारा हा कोकणपुत्र! असं म्हणतात की, कोकणी माणूस हा निसर्गतः कलेचं वरदान लाभलेला... जन्मतः नाट्य, कला, संगीतावर जीव ओवाळून टाकणारा... !

T.V. वर राज कपूरजींचा सिनेमा सुरु झाला की पप्पा (गोवेकर) नेहमी म्हणायचे, हे बाळचं चित्र, हा बाळचा बॅनर, ही बाळची मूर्ती. नंतर नंतर जसजसं समजायला लागलं, तसं "बाळ" ह्या व्यक्तीबद्दल आदर, सन्मान वाढतंच गेला. बाळ म्हणजे आमचे "बाळकाका" - आमच्या पप्पा गोवेकरांचा सख्खा मोठा भाऊ... आमच्या गोवेकर घराण्यातील आणखी एक प्रतिभाशाली व्यक्तिमत्व!

त्यांच्या चित्रांच्या प्रदर्शनाची तारीख ठरली कि, बाळकाकांचा आमंत्रणाचा फोन ठरलेला. मग आम्ही सगळी भावंड खूप आनंदायचो आणि मोठ्या उत्साहाने तयारीला लागायचो. लहानपणी आम्ही सगळी चुलत-आते भावंड मिळुन दादर T.T. हून (बेस्ट क्रमांक १ - काळा घोडा - जहांगीर आर्ट गॅलरी ) पकडून, बाळकाकांच्या प्रदर्शनाला आवर्जून जायचो. छान इस्त्रीचे कडक कपडे, पायात मोजे, चकाचक पॉलिशचे बूट, अगदी टीप-टॉप तयार होऊन नटूनथटून निघायचो. बाळ काकांचे खास "छोटे" पाहुणे म्हणून आम्हाला विशेष भाव मिळायचा. त्यांची मॉडर्न आर्ट समजण्याएवढे वयाने आणि बुद्धीने देखील लहानच होतो, पण त्यांना मिळणारा मान-सन्मान, आदर, प्रेम समजण्याइतपत नक्कीच मोठे होतो.

पूर्वी कोकणात एकत्र कुटुंब पद्धतीत घराचा गणपती, त्या घरातलाच एखादा मूर्तिकार करीत असे. लहानपणापासूनच शिल्प-कृती, abstract पेंटिंग्स बनवायची नैसर्गिक देणगी लाभलेले बाळकाका गोवेकरांचा गणपती स्वतः करायचे. गणपतीची मूर्ती बनविताना ते एवढे तल्लीन होत असत की, कित्येकदा त्यांच्या बोटातल्या सोन्याच्या आंगठ्या पण त्या मूर्तीस बहाल केल्या गेल्याचे किस्से, आम्ही आजीकडून ऐकल्याचं मला चांगल आठवतं. त्यावेळी लालबागच्या राजाच्या गणेशोत्सवात बाळकाका सक्रिय भाग घेत असतं. रात्ररात्र जागून गणपतीची मूर्ती, त्यामागचे पडदे, आरास, फिरत्या मातीच्या बाहुल्यांचे चित्र-देखावे, स्वतः बनवत असत. ते काम आटपून कोकणात आपल्या स्वतःच्या घरची गणेशमुर्ती घडवायच्या कामास लागत. हातात घेतलेलं चित्र-शिल्पकलेचं कोणतंही काम, स्वतःच्या मनाजोगं पूर्ण होईपर्यंत त्यांचं दुसरीकडे कुठेही लक्ष लागत नसे. चित्रकलेबरोबरच बाळकाका पाककलेत देखील निपुण होतें. माश्याच्या कालवणाच्या रंगावरून, किंवा नुसत्या वासाने ते कसं झालं आहे, ते अचूक टिपत असत.

इतर चाकरमान्यांप्रमाणेच पोटापाण्याच्या विवंचनेतून नोकरीसाठी कोकणातून मुंबईची वाट धरलेले माझे आजोबा, त्यावेळी लालबाग इथल्या "बावला बिल्डिंग" ह्या चाळीत एका छोट्याशा खोलीत रहात असत. बाळकाकांचा चित्र आणि शिल्पकलेचा व्यासंग पाहून, पुढे त्यांनी चित्रकला क्षेत्रातच करियर करायचं ठरवलं. मुंबईतल्या जे.जे.स्कूल ऑफ आर्टस् मधून "मॉडर्न आर्ट" मध्ये पदवीसह विशेष नामांकन पटकावून बाळकाकांनी, ह्या मुंबापुरीत आपलं नशीब आजमावायला सुरुवात केली. आपल्या कलेच्या सामर्थ्यावर, या कलाकाराने हिंदी चित्रपट सृष्टीत भक्कम पाय रोवला. आणि R.K. प्रॉडकशन्स - R.K बॅनर (१९५० ते १९७० ) साठी काम करायला सुरुवात केली. हिंदी चित्रपटांचा सुवर्ण काळ - Golden Era! ह्या काळात बरसात, आवरा, आग, श्री. ४२०, मेरा नाम जोकर, बॉबी अश्या एका पेक्षा एक सुपरहिट, अवॉर्ड विनिंग चित्रपटांनी फक्त हिंदी सिनेसृष्टीच नाही तर संपूर्ण जगभरात आपला ठसा उमटवला. त्यांच्या चित्रकौशल्याबद्दल मोरारजी भाई देसाईंच्या हस्ते राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

करण्यांत आलं होतं. ह्या चित्रपटातून झळकलेल्या, बाळकाकांच्या सर्व शिल्पकृती, पोस्टर्स, तैलचित्र, वेगवेगळ्या मूर्ती, विशेषतः - "mother & child" शिल्पकृती, रंगीत पडदे जणू काही कपूर घराण्याची "दिलोंकी धडकन" बनली. अनाडी चित्रपटातील सायकलवरून जाणाऱ्या राजजींच्या हातातली सगळी चित्रं, प्रत्यक्षात ह्या कलाकाराने रेखाटली होती. मुंबईतल्या चेंबुरच्या R.K. Studios मध्ये समस्त कपूर कुटुंबियांसमवेत गणपती आणि होळी मोठ्या उत्साहाने साजरी व्हायची. सगळ्या उत्सवात, आनंदाच्या क्षणी, घरच्याच सदस्यांत बाळकाकांची आग्रहपूर्वक गणना होत असे..

अर्थात आत्तासारख्या फिल्म मेकिंगच्या डिजिटल युगातील आधुनिक-तांत्रिक सुखसोयी त्याकाळी सिनेक्षेत्रात नक्कीच नव्हत्या त्यामुळे प्रत्यक्ष आर्ट टीमच्या कौशल्यपूर्ण कारागिरीचा पूर्णतः कस लागायचा. ह्या दरम्यान, बाळकाकांनी स्वतःच्या हाताने रंगविलेल्या पडद्यावरच्या उफाळलेल्या समुद्राच्या लाटा अगदी हुबेहूब भासत. आणि हीच त्यांच्या कामाची खासियत कपूर घराण्यातील सगळ्या सदस्यांना अक्षरशः भुरळ पाडत असे. राजजींबरोबरची त्यांची मैत्री पुढे पुढे वाढतच गेली. हळुहळू बाळकाकांच्या प्रदर्शनाला सगळीच कपूर मंडळी आणि बॉलीवूडमधली बरेच नामवंत सिनेकलाकार, इतर सुप्रसिद्ध नट-नट्या अगदी वेळात वेळ काढून हजेरी लावू लागली.

बाळकाकांनी, आर. के. बॅनर्स साठी बरीच वर्षे काम केलं. नंतर पुढे, एका चित्रपटाच्या चित्रीकरणा दरम्यान झालेल्या भीषण अपघातामुळे पडद्यामागचे बरेचसे कारागीर, स्टेज बॉईज, आगीत होरपळून जबर जखमी झालें. चित्रपटांच्या सेटवर होणाऱ्या अश्या अपघातांविषयीच्या बातम्या आजही आपण ऐकत असतो. अर्थात त्यावेळी ह्या सगळ्या पडद्यामागील स्टाफ ला मिळणारं वेतन हे किरकोळच असायचं. आणि त्यात शूटिंगच्या वेळी वारंवार होणारे हे अपघात - ही एक अनिवार्य बाब होती. त्याकाळी अपघातात सापडलेल्या कारागिरांच्या कुटुंबीयांची कुठल्याही प्रकारे परवड होऊ नये म्हणून ह्या सगळ्या कामगारांचा पगारवाढ होणं हे अत्यंत गरजेचं होतं. आर.के. बॅनर्स चे सगळे चित्रपट प्रसिद्धीच्या शिखरावर असलें तरी वर्षानुवर्षे कामगारांच्या वेतानात काहीच वाढ होत नव्हती.

समस्त कामगार वर्गाने नुकसान भरपाई म्हणून आर्थिक मदतीच्या मागण्या करायला सुरुवात केली, पण ह्या वेतन वाढीची फारशी दखल घेतली गेली नाही. कामगारांनी चिडून सरते शेवटी संप करून, आपल्या मागण्या मॅनेजमेंटपर्यंत पोहोचविल्या. पण दुर्दैवाने त्याकडे दुर्लक्ष केले गेले. एक सच्चा कलाकार ह्या नात्याने, कलेशी इमान राखणाऱ्या आपल्या इतर सहकाऱ्यांवर होणारा अन्याय बाळ काकांना अर्थातच सहन झाला नाही. मॅनेजमेंटच्या ह्या अनपेक्षित वर्तनाने, कलेशी स्वामिनिष्ठ असलेल्या बाळकाकांनी देखील तडकाफडकी नाराजी व्यक्त करून, आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. पुढे हे प्रकरण चिघळतंच गेलं. कंपनीच्या युनिअनच्या खटल्यात बाळ काकांनी कामगारांची बाजू घेतल्याने, या दोघांच्या दोस्तीला पुरतं गालबोट लागलं आणि तात्त्विक वादामुळे हे दोन जीवलग मित्र काहीकाळ थोडेसे दुरावले!




Pillars of Strength and Character.
Premier Provider for Property and Casualty Insurance
HRTG
LISTED
NYSE
HERITAGE®
Insurance
(855) 536-2744
www.heritagepci.com
WITH BEST COMPLIMENTS OF HERITAGE INSURANCE HOLDINGS, INC.
AND VIJAY S. WALVEKAR, ONE OF ITS FOUNDERS AND DIRECTORS.

# स्नेहबंध

असं म्हंटलं जातं कि कलाकार हा शापित असतो... आणि त्याच्या घरी लक्ष्मी आणि सरस्वती एकत्र नांदत नाहीत... तसंच काहीसं बाळकाकांच्या बाबतीत घडलं. फारश्या प्रसिद्धीझोतात न राहण्याची त्यांची वृत्ती किंवा आपल्या कलेशी इमान राखतांना, पैश्याच्या मागे न लागण्याचा मूळ स्वभाव किंवा नशिबाची साथ नसेल कदाचित! हे दुर्दैवाने "झाकलं माणिक" झाकलंच राहिलं ...

पुढे बाळकाकांनी एका शाळेत शिक्षकाची नोकरी पत्करली आणि लहान मुलांना "मॉडर्न आर्ट" शिकवायची त्यांची खूप आधीपासूनची इच्छा पूर्ण केली. आणि जास्तीत जास्त सामान्य लोकांपर्यंत ह्या कलेचा विकास व्हावा ह्यासाठी, ते सतत प्रयत्नशील राहिले. सगळ्या लहान मुलांना ते अगदी सोप्या पद्धतीने गणपतीचे चित्र काढायला शिकवीत असत आणि त्यांचा समस्त शिष्यगण - सगळी चिल्ली-पिल्ली देखील, त्यांच्यासमवेत चित्रकलेत अगदी रममाण होत असत. शिवचरित्रातले काही ऐतिहासिक क्षण म्हणजे शिवजन्मापासून ते शिवराज्याभिषेकापर्यंतच्या सगळ्या रोमांचक आठवणी त्यांनी आपल्या चित्रांद्वारे हुबेहूब टिपल्या. बाळकाकांच्या शिवराज्याभिषेकाच्या चित्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या गळ्यातील सुवर्णालंकार, मोत्याच्या माळा अगदी खऱ्या वाटायच्या. पुढे त्यांनी, माझ्या सगळ्यात मोठ्या, शिक्षिका असलेल्या आत्याच्या "हडी" गावातल्या शाळेला छोट्या मुलांना भेट म्हणून,सगळी चित्रं दान केली. आजूबाजूच्या गावांतून, खूप लांबून लांबून लोक ही चित्रं बघायला शाळेत गर्दी करीत असत. प्रत्येक चित्रातली वास्तवता, कुठेतरी मनात घर करत असल्याने, ही सगळी मंडळी अक्षरश: अचंबित होत असत. आणि अगदी मनापासून उत्स्फुर्त दाद देत असत. असो.

काकांची एकीकडे नोकरी चालू होतीच आणि सोबत चित्रांची प्रदर्शने सुद्धा. राजजी आणि समस्त कपूर कुटुंबीय पुन्हा एकवार आवर्जून बाळकाकांच्या प्रदर्शनाला येऊन भरभरून त्यांचं कौतुक करू लागली. काही तात्त्विक वाद वगळता, ह्या दोन मित्रांची मैत्रीची घट्ट वीण वाखणण्याजोगी होती.

मला राहून राहून असं वाटायचं कि बाळकाकांच्या ह्या सगळ्या आठवणीं, त्यांचे अनुभव, त्यांचा चित्रप्रवास कुठेतरी शब्दरुपात जतन करावा. आणि त्यात माझी साथ दिली ती माझ्या ताईने (सौ.रेश्मा गोवेकर-जाधव). तिने जपून ठेवलेल्या ह्या फोटोंमुळे आणि मार्गदर्शनामुळे, ह्या जुन्या आठवणींचा अमूल्य ठेवा तुम्हा सगळ्यांबरोबर वाटतांना खरंच खूप अभिमान वाटतो आहे. ह्या कलेच्या पुजाऱ्याला आमची भावपूर्ण शब्दरुपी "आदरांजली" !


गेल्या २/३ वर्षांपूर्वी (२०१७) R.K स्टुडिओस लागलेल्या भीषण आगीमुळे बरंच नुकसान झालं आणि बराचसा स्टुडिओ एका रिऍलिटी शो च्या शूटिंग च्या दरम्यान जळून बेचिराख झाला. आणि झर्रकन मन लहानपणीच्या दादर-हिंदू कॉलनीतल्या "राजगृह"च्या आठवणींत रमलं. आणि प्रकर्षाने जाणवलं, कुठेतरी ह्या दोन जिवलग मित्रांचे आत्मे हळहळले असतील... जिथे कुठे असतील तिथे कदाचित आजही मॉडर्न आर्टवर चर्चा चालू असतील, राजजींबरोबर कला-दिग्दर्शनाच्या गप्पा रंगल्या असतील. लता, मुकेश, नर्गिस, मधुबाला यांची गाणी गुणगुणत... किंवा शंकर-जयकिशनजींच्या चालीवर मंत्रमुग्ध होऊन असं ही म्हणत असतील ...



हम ना रहेंगे, तुम ना रहोगे...

फिर भी रहेंगी निशानीया... !!

**सरोज स्नेहल-सुरेश गोवेकर**




## सफर आधुनिक (मॉडर्न) भारताची!

आज तब्बल तीन वर्षांनी भारत दौरा करायची संधी मिळाली ती माझ्या मुलाच्या मुंजीच्या निमित्ताने! या मागची भेट झाली होती ती माझ्या मेहुण्याच्या (बायकोच्या भावाच्या) लग्नासोहोळ्यामुळे. आपल्याकडे कोणतेही शुभकार्य झाले की देव दर्शनाला जाणे ही एक पारंपरिक आणि सांस्कृतिक शिकवण व भावना आहे. आता लग्नकार्यानंतर देवदर्शन म्हणजे दोन्ही कुटुंबीय एकत्र, सहकुटुंब व सहपरिवार जाणे हे आलेच. किमान १०-१५ सदस्य म्हणजे, १ मोठी बसगाडी किंवा २ छोट्या गाड्या लागणारच! मग ओळखीने विचारपूस करून भरवशाचा ड्राइव्हर व गाड्या शोधणे व त्यांचे आरक्षण (बुकिंग) करणे ही म्हणजे उडत्या पाखराची पिसे मोजण्यासारखी मोठी कामगिरीच जणू! त्यात आपल्या वेळेला गाडी उपलब्ध नसणे किंवा आरक्षण करणारा जाग्यावर नसणे हे काही आपल्या साठी नवीन नाही. त्यात पुन्हा ज्या दिवशी निघायचे असते त्यादिवशी गाडी व ड्राइव्हर उशिरा येणे, त्याला बोलावण्या-साठी पुन्हा कोणीतरी दुचाकीवरून जाणे, त्याची या ड्राइव्हरची चुकामुक होणे, सर्वांचा जीव कासावीस होणे, आणि मग उशीर झाला म्हणून चिडचिड करत देव दर्शनासाठीच्या प्रवासाला सुरुवात करणे. ही म्हणजे आपली 'घर घर कि कहानी'! शेवटी, आलिया भोगासी असावे सादर करीत आपण पुढे चालत राहतो.

आता मंडळी, तुम्ही म्हणाल, हे काय रडगाणे गात बसलो आहे मी. शीर्षक तर काय म्हणे 'सफर आधुनिक भारताची' आणि त्याला साजेसा काहीच उल्लेख नाही. कसे आहे, पार्श्वसंगीताशिवाय जशी गाण्याला शोभा येत नाही, तशी लेखाला सुद्धा पार्श्वभूमीशिवाय उत्तरार्धाची मजा नाही. चला तर करूया सफर आधुनिक भारताची. शुभकार्य: मुलाची मुंज, स्थळ: आपले पुणे, सन: २०२०, अनुभव: देव दर्शनासाठी गाडी भाड्याने घेणे.

या वेळी गाडी ठरवायची होती ती ५ जणांना पुरेल अशी. अहो मुंज होती नां, मग एकच पार्टी. त्यात आम्ही अमेरिकेहून विमान प्रवास करून आलो (खरेतर घोड्यावर बसून आलो हेच म्हणणे योग्य होय) आणि तेही तब्बल ३ वर्षांनंतर. आम्हाला काय डोंबल माहिती असणार गाड्या कुठे मिळणार. पण भारताच्या आधुनिकतेची ओळख होण्याची आमची ही पहिली पायरी. आजकाल गाड्या भाड्याने आरक्षित करणे आता ऑनलाईन शक्य होत आहे! आता म्हणाल त्यासाठी डेटाप्लॅन नको का फोन वा लॅपटॉपवर? अहो १.५ जीबी पर डे, असा सहज आणि अमेरिकेपेक्षाही शतपटीने स्वस्त दरात उपलब्ध होतो आणि तेही पूर्ण एका महिन्यासाठी! आहात कुठे - अहो असे काय करताय, आपल्या भारतातच!

बऱ्याच संस्था ही गाडी भाड्याने ऑनलाईन आरक्षित करण्याची सुविधा पुरवतात. मग काय, मेहुण्याच्या मार्गदर्शनाखाली गाडी चक्क ऑनलाईन आरक्षित केली. बरेच पर्याय उपलब्ध होते. आसन-क्षमता (२, ५, वा ७ प्रवासी), आवडता उत्पादक (ब्रँड), पसंतीची ठराविक गाडी, मर्यादीत किंवा अमर्याद किलोमीटर, स्वयंचलित प्रेषण (ऑटोमॅटिक ट्रान्समिशन) किंवा गियर ड्रायविंग पद्धत, वातानुकूलित किंवा नैसर्गिक हवा, वाहनचालकासहीत किंवा स्वतः चालक (सेल्फ ड्राइविंग), इंधनशुल्कासह किंवा इंधनशुल्काविना आणि किती तास, दिवस, आठवडे किंवा महिने हवी आहे भाड्याने या सर्व पर्यायांची सांगड घालत आम्ही गाडी ठरवली. आरक्षित करण्यासाठी, मग आम्हाला परवाना (लायसेन्स), फोटो आयडी (आधार कार्ड वगैरे), व चालकाचा तात्काळ डिजिटल फोटो ऑनलाईन जमा करावा लागला. पडताळा झाल्या नंतर मगच आमचे आरक्षणाचे पुष्टीकरण (कन्फर्मेशन) झाले. पहा, पहिल्याच मोठ्या कामगिरीची कसे ३० मिनिटात फतेशिकस्त केली. आम्ही विनाचालक (सेल्फ ड्रायविंग), स्वयंचलित प्रेषण (ऑटोमॅटिक ट्रान्समिशन) युक्त, इंधनशुल्कासहित अशी मारुती सुझुकी डिझायर आरक्षीत केली.

अहो अजून आधुनिक भारताचे वर्णन बाकी आहे. दिवस उजाडला गाडी आणण्याचा. ठरवलेल्या वेळेच्या आधी २ तास, एसएमएस आला. त्यात गाडीचे स्थळ, क्रमांक, रंग, आणि फोटो असे सर्व माहिती असलेल्या संकेतस्थळाची(वेबसाईट) लिंक आली. गूगल मॅप्सचे स्थळ खूपच सोयीस्कर होते. मग काय, आता गाडी आणायला जायचे तर कसे जाणार? आता पुढची आधुनिकता. विशेषतः पुण्यात तुम्हाला असा अनुभव आला आहे का हो, की तुम्ही रिक्षावाल्यांना विचारले की 'दादा, अमुक-अमुक ठिकाणी येणार का?' आणि मग त्यांची अशी काही काळजात कट्यार घुसवणारी प्रतिक्रिया असते की जणू काही आपण प्रश्न विचारून गुन्हाच केला आहे. मग एक तर मुंडी हलवून किंवा तुसडेपणाने 'नाही' असे उच्चारत तोंड फिरवणे हे म्हणजे नित्यक्रम. आपली गत म्हणजे गरजवंताला अक्कल नसते अशी होते हो. पण आधुनिक भारताने यावर ग्राहकाला दिलासा देणारा एक उपाय शोधला आहे पुन्हा, ऑनलाईन आरक्षण! अहो, आता रिक्षा पण ऑनलाईन आरक्षित करता येते. प्रसिद्ध संस्थानी, काही रिक्षावाल्यांशी करार करून ऑनलाईन आरक्षण व प्रवाससेवा उपलब्ध करून दिली आहे. पण महत्वाचे म्हणजे, आरक्षण केल्यावर आपल्याला, रिक्षाचालकांचा फोटो, दूरध्वनी (फोन) क्रमांक, त्यांचे आत्ताचे स्थळ पूर्वनिर्धारित भाडे आणि किती आपल्या स्थळापाशी पोहोचण्यास वेळ लागणार, हे सर्व ऑनलाईन ट्रॅक करता येते.

आणि मग मी रिक्षा आरक्षित केली, ती आली, आणि चक्क रिक्षाचालकांनी मला स्मितहास्ययुक्त अभिवादन (ग्रीट) केले. झालात ना अवाक? अहो, माझेही असेच काही झाले. रिक्षा बसल्यावर भित्तीपत्रिका होती की ऑनलाईन पैसे स्वीकारण्यात येईल. म्हणजे सुट्ट्या पैशांचे वांदे नाहीत. तसेच निकडीच्या प्रसंगी (इमर्जन्सी), म्हणजे जर चालक ऑनलाईन दर्शिलेल्या मार्गाशिवाय भटकला, तर पोलिसांना फोन अशी थेट सुविधापण उपलब्ध होती. आणि मला इच्छित मुक्कामस्थळी रिक्षाने मला पोहोचवले.

कशी चालू आहे सफर आधुनिक भारताची? उत्कंठावर्धक, आश्चर्यकारक तरीही समाधानकारक? आपल्या भारताची अशी सुधारणा आणि आधुनिकता आहेच हो अशी गर्व बाळगण्यासारखी. ये तो ट्रेलर है मेरे दोस्त, पिक्चर अभि बाकी हैं!

आता वेळ आली गाडी ताब्यात घेण्याची. अहो आश्चर्यम् , गाडी एका सोसायटीच्या पार्किंगमध्ये लावली होती. कोणीही माणूस नाही आजूबाजूला. आली का पंचाईत! कसे करावे, काय करावे, काही सुचेना. मग आठवले की एक फोन क्रमांक पण होता संस्थेचा. कॉल केला तर त्यांनी सांगितले, अहो, तुम्हाला जी ई-मेल आली आहे ना, त्यात एक तपासयादी (चेकलिस्ट) आहे. हे म्हणजे काखेत कळसा आणि गावाला वळसा! पुन्हा ऑनलाईन! डेटाप्लॅनचा पुरेपूर वापर! दीड जीबी आहे, वापरा धडाधड! हे सगळे ठीक आहे हो पण गाडीची चावी कशी मिळणार हे कोडे काही उलघडेना. दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला पण गाडी तर बद्ध (लॉक्ड). असो, म्हंटले जरा तपासयादी (चेकलिस्ट) मधील सूचना पाळूया. पहिली सूचना, गाडीचे सर्व बाजूने फोटो काढले अगदी तपशीलवार म्हणजे, बम्पर, दरवाजा, समोरची काच, आरसे, चाकं, टायर, दरवाज्यावरील काचा, मागची काच, मागचे बम्पर, इत्यादी. हे सर्व झाल्यावर, पुढची सूचना - गाडी योग्य वाटत असेल तर बटन दाबा ऑनलाईन फोनवर. म्हणजे गाडी खुली (अनलॉक) होईल. झालात ना अवाक? अहो मला असा अनुभव कधीही आला नाही, अमेरिकेतसुद्धा! बटन दाबताच गाडी खुली! समजले का? आहो भारताने जे उपग्रह (सॅटेलाईट) अवकाशात सोडले ते काही फक्त इतर देशांच्या सोयीसाठी नव्हे, तर प्रगतिशील भारत घडवण्यासाठीच.

आता पुढची सूचना, गाडीच्या आतले फोटो. बरे एक सांगायचे राहिले. जसे-जसे प्रत्येक भागाचे फोटो मी काढीत होतो व अपलोड करत होतो तसे, जर काही ओरखडे (स्क्रॅचेस) आधीच्या भाडेकरूने निदर्शनास आणून दिले असतील तर, ते आधीच नोंद केलेले दिसले. आधी नोंद केलेल्या ओरखड्यांव्यतिरिक्त जर काही नवीन नोंद करायचे असेल तर तशी सुविधा उपलब्ध होती. अशीच सेवा गाडीच्या आतील भागांच्या नोंदणीसाठी सतर्क होती. झाले तर. गाडी तशी बऱ्यापैकी स्वच्छ होती आणि धूम्रपान-निषिद्ध होती. आता मला समजले की चावी प्रवासीआसनाच्या समोरील कप्प्यात होती. आता शेवटची सूचना! ओडोमीटरचा फोटो. गाडी ठराविक किलोमीटर साठी आरक्षित केल्यामुळे हे गरजेचे होते. हुश्य! ३० मिनिटात गाडी हातात, तेही कुणाही मनुष्य सहकार्याविना.

व्रुम-व्रुम करत गाडी घेऊन देव दर्शनाला निघालो आम्ही कुटुंबीय. पुन्हा आधुनिकता. गाडीची वेगमर्यादा जास्तीत जास्त ८० किलोमीटर प्रति तास अशी निर्धारित केली होती. प्रवेगाकावर (ऍक्सिलरेटर) तुम्ही जरी उभे राहिलात, काहीही उपयोग नाही! ८० च्यावर वेग जाणे नाही! मला ही सुविधा आवडली सुरक्षिततेसाठी. गाडी मस्त चालली, अर्थात चालवणारा मीच होतो. तेवढेच आपले कौतुक. जानेवारी महिना असूनही वातानुकूलित गाडीचा अनुभव सुखकारक होता. स्वयंचलित प्रेषण (ऑटोमॅटिक ट्रान्समिशन) असल्याने गाडी चालवण्याचा शीण आला नाही. विशेष करून घाटामध्ये गाडी चालवणे आरामदायी झाले. गाडीमध्ये इंधन भरावे लागले नाही कारण आम्ही पुण्याहून प्रतिबालाजी मंदिर, केतकावळे येथे गेलो होतो. पण माहितीसाठी सांगतो, जर इंधन भरावे लागले असते तर त्याचा परतावा (रिफंड) अंतिम हिशोबातून वजा केला जातो, जर तुम्ही इंधनभारासह आरक्षण केले असेल तर.

आता परत आल्यावर, पुन्हा तसेच. गाडी त्याच ठिकाणी लावली, आतले व बाहेरचे फोटो काढून अपलोड केले. जर आपण चालवताना काही नुकसान झाले असेल तर त्याची नोंद करायची. ओडोमीटरचा फोटो काढून शेवटच्या सूचनेकडे. ही सूचना महत्वाची. कारण आता वेळ झाली आहे आपले सगळे वैयक्तिक सामान गाडीतून काढून घेऊन गाडी बंद करून, चावी पुन्हा त्याच जागेला ठेवून गाडीतून बाहेर उतरण्याची. शेवटचे हे बटन दाबून आपण पुष्टी (कन्फर्म) करायचे की, गाडी बद्ध (लॉक) करा.

मग पुन्हा ऑनलाईन रिक्षा आरक्षित केली, घरी आलो. या आरक्षण सोयीमुळे ग्राहकाला सेवादाता मिळाला व सेवादाताला ग्राहक. अर्थातच, खाईन तर तुपाशी नाहीतर उपाशी दृष्टीकोण असणाऱ्या रिक्षाचालकांनी सहभाग नाही घेतला यात विशेष ते काहीच नाही. या रिक्षा-आरक्षणाचा अजून एक फायदा नमूद करणे गरजेचे आहे. जर तुमचे घर मुख्य रस्त्यापासून आतल्या बाजूला असेल तर सहसा रिक्षावाले उतरताना कटकट करतात व अजून पैसे मागतात. पण या ऑनलाईन आरक्षित रिक्षाच्या पूर्वनिर्धारित भाड्यामुळे, प्रवासाच्या शेवटी शांतता व समाधान वाटते. आणि रिक्षाचालकाचे अभिवादन व स्मितहास्य मन प्रफुल्लित करून जाते!

आता जरा पहिला परिच्छेद (पॅराग्राफ) पुन्हा वाचा आणि सुस्कारा टाका, कारण या परिच्छेदातील अनुभव इतिहासजमा झाला आहे. मग काय मंडळी, कसा वाटला आपल्या विकसित भारतातील आधुनिक सोयींचा सुखद अनुभव?

**- प्रदिप नाईक**

स्नेहबंध

## दोन डोळे

(चाल: ईन्साफ की डगर पे)

हे दोन अजुब डोळे, अगदीच रे निराळे
काळातूनी ढळूनी, उगळूनी झाले भोळे

हे दोन अजुब डोळे, अगदीच रे निराळे
भोळे असे हे डोळे, दिशा ना काही अंत
जेव्हा मला कळाले, मन झाले रे श्रीमंत

हे दोन अजुब डोळे,  अगदीच भोळे भोळे
जेव्हा मला मिळाले,  डोळ्यास भोळे डोळे
ढवळूनी ह्या मनाला,  गंधूनी आज गेले

हे दोन अजुब डोळे,  अगदीच भोळे भोळे
वेळात ह्या पळी कां,  वाटे मला निराळे
डोळ्यात माझीया रे,  मिसळूनी एक झाले

**- निरंजन हुंबड**


Taal Academy

Learn the versatile
Indian Classical Kathak Dance
with renowned Kathak Dancer,
Manisha Dongre

Locations -

Monday to Saturday | Troy | Bharatiya Temple, City style Tango studio

Sunday | Novi | Detroit India cultural center

Special Batches for Adults and Moms

248-740-5915
www.manishadongre.com
fb.me/taalkathak




# स्नेहबंध









एकदा काय झालं मी घरातून खिडकी बाहेर बघत असतांना मला एक पक्षी घरी खाली टेबलावर बसलेला दिसला. बाहेर खुप पाऊस पडत होता. त्यामुळे तो पक्षी त्याच्या घरट्या कडे जावू शकत नव्हता. त्याचे घरटे जवळच झाडावर होते. पाऊस थांबल्यावर तो पक्षी घरट्याकडे गेला. ते बघुन मला पण बाहेर जायची ईच्छा झाली. मी बाहेर गेलो आणि मित्रां बरोबर चेंडू खेळायला लागलो. चेंडू घ्यायला मी झाडा जवळ गेलो. मला घरटे दिसले. मग मला दिसले ते घरटे पान आणि काडीचे बनलेले होते. मला दिसले तो पक्षी पिल्लांना अळ्या चोचीने खाऊ घालत होता. मला ते बघुन खुप आनंद झाला. त्या नंतर मी घरी गेलो आणि आई बाबांना सर्व गोष्ट सांगितली.

पार्थ देशमुख

# स्नेहबंध





चु-चु, चु-चु करत पिल्लु बाहेर पडले
पाऊसात. आनंद घ्यावा या पाऊसाचा
आले त्याच्या मनात. छत्री उघडून
ऐटीत मीत्रांकडे निघाले, हा पाऊस
किती सुंदर त्याच्या मनात आले.
गाणे गुण-गुणत, माज्जा करून,
पावसात खेळून आले

भुवी नारखेडे
ट्रॉय, मिशीगन




kw CENTRAL
KELLERWILLIAMS.
35427 Dodge Park Rd. Sterling Heights, MI 48312
SELL IN A FLASH, CALL KASH!

**REALTOR®, KASHMIRA DESAI**
YOUR METRO DETROIT EXPERT
View What is *ACTIVE, PENDING & SOLD* in your Neighborhood go to www.kashmira.kwrealty.com
Cell (248) 974 6979 Office (248) 655-7955
realtor.kashmira@gmail.com

Each Keller Williams Office is Independently Owned and Operated

## घरबसल्या...




बाहर से कोई अंदर ना आ सके
अंदर से कोई बाहर ना जा सके
सोचो कभी ऐसा हो तो क्या हो?

राज कपूर साहेब मोठे द्रष्टे होते. पुढे येणाऱ्या करोनायुगाची, पर्यायाने घरकोंबडे होण्याची, नांदीच त्यांनी लिहून ठेवली होती.

नाही, म्हणजे मी तसा काही फार outgoing (काही ठिकाणी इंग्रजी शब्द वापरायला बरे जातात. 'बाहेरख्याली' म्हंटलं कि वेगळाच 'वास', अंतु बर्व्याच्या शब्दांत 'तर्जनी-नासिका-न्यायातला', येतो...) प्रकारात मोडत नसलो तरी; आपलं चार मित्र जमावावेत, थोडा गाण्यागिण्याचा षौक करावा, नाटक-सिनेमा पाहावेत, आवडत्या रेस्टॉरंटात जाऊन चापून जेवून यावं... हे सर्व आता कालबाह्य का काय म्हणतात तसं होऊन गेलंय. किंवा हे सर्व आता बादली यादीत, याने की bucket list मध्ये, घालायच्या गोष्टींत जमा व्हायला लागलंय... असो!!

लहानपणी 'सातच्या आत घरात' असा काही कायदा नसला; तरी दिवेलागण झाली कि पाय आपोआप घराकडे वळायचे. "बाहेर गिळायला मिळत नाही म्हणून घरात येता." (इति तीर्थरूप.... पुन्हा असोच!!!). तर मुद्दा काय; अगदी
**या चिमण्यांनो परत फिरा रे, घराकडे अपुल्या; जाहल्या तिन्हीसांजा....** असं म्हणायची वेळ मातोश्रींवर यायची नाही.

गेले अठरा महिने घरकोंबडा झालो आहे. आता घरबसल्या ऑफिसच्या कामाच्या पाट्या टाकायच्या, नाहीतर 'फेबु'वर पोस्ट्स टाकायच्या...; असं असतांना घराची गाणी आणि कविता, जात्याची घरघर चालू असावी; तशी डोक्यात वाजत असतात... त्या आठवणींतल्या कवितांत
**गोष्टी घराकडिल मी वदतां गडया रे;**
**झालें पहा कितिक हें विपरीत सारे** (केशवसुत) असतात.

**घर थकलेले संन्यासी, हळूहळू भिंतही खचते**
**आईच्या डोळ्यांमधले नक्षत्र मला आठवते** (कवी: ग्रेस; संगीत: हृदयनाथ मंगेशकर)
अशी आशयघन, अस्वस्थ करणारी कविता असते.

**जिवलगा, राहिले रे दूर घर माझे;**
**पाऊल थकले, माथ्यावरचे जड झाले ओझे**
(गीत: शांता शेळके, स्वर: आशा भोसले) अशी अवीट गाणी असतात.

**घरात हसरे तारे असता**
**मी पाहू कशाला नभाकडे** (गीत: द वि केसकर; गायिका: लता मंगेशकर)
बालगोपाळांनी भरलेल्या नांदत्या, गाजत्या घराचं अतिशय लोभस वर्णन करणारं गाणं असतं.

**घर असावे घरासारखे नकोत नुसत्या भिंती;**
**इथे असावा प्रेम-जिव्हाळा नकोत नुसती नाती** (कवियत्री: विमल लिमये; संगीत: श्रीधर फडके)
अशी घराची यथार्थ महती वर्णन करणारी गाणी असतात.

कानात आणि मनात घर केलेल्या गाण्यांत; मराठी गाण्यांपेक्षा हिंदी गाणीच जास्ती आहेत. त्यात
**ये तेरा घर ये मेरा घर, किसी को देखना हो गर;**
**तो पहले आ के माँग ले, मेरी नज़र तेरी नज़र...** (साथ साथ) हे गाणं आहे.

लोकसंगीताचा बाज लेवून येणारं
**मेरो गाम काठा पारे, जहाँ दूध की नदियाँ बाहे;**
**जहाँ कोयल कू कू गाये, म्हारे घर अंगना न भूलो ना** (मंथन) हे गाणं येतं.

**रात आई तो वो जिनके घर थे, वो घर को गए सो गए;**
**रात आई तो हम जैसे आवारा, फिर निकले राहों में और खो गये** (तेजाब) हे वाहवलेल्या, निरुद्देश, टपोरी दिवसांतलं गाणं येतं.

'अभिनेत्री' स्मिता पाटीलसाठी पाहिलेल्या तद्दन व्यावसायिक सिनेमातलं
**लोग जहां पर रहते हैं, उस जगह को वो घर कहते हैं;**
**हम इस घर में रहते हैं, इसे प्यार का मंदिर कहते हैं** (प्यार का मंदिर) हे गाणं आज इतक्या वर्षांनीं सुद्धा आठवत असतं.

काका आणि अम्माचं
**किसका महल है, किसका ये घर है;**
**लगता है ये कोई सपना सजना,**
**प्रेमनगर है ये अपना...**(प्रेमनगर)

पुढे आलेल्या कवळ्या नायक-नायिकांच्या जोड्यांपुढे काका आणि अम्मा अगदीच थोराड (खरंतर जून) दिसायचे.... पण आपण चालवून घ्यायचो! काळी पांढरी मिशी लावलेला, पण तरीही अतिशय रुबाबदार दिसणारा,
**मेरे घर आई, मेरे घर आई; एक नन्ही परी,**
**एक नन्ही परी; चाँदनी के हसीन रथ पे सवार....** (कभी कभी)
गाणं त्याच्यावर नसलं; तरीही भाव खाऊन जाणारा अमिताभ "कौन है अंजु?" म्हणत यायचा. '
**देखो मैंने देखा है ये इक सपना;**
**फूलों के शहर में है घर अपना** (लव्ह स्टोरी)
म्हणत बंटी आणि पिंकी येतात.

10+ years of strong results in Test Prep (SAT, ACT), K-12
Core, Computer Science, and College Advisory Services

MAYA PREP
Motivating Excellence

MICHIGAN | Northwestern University | Massachusetts Institute of Technology | Cornell University | Columbia University | Harvard | California Institute of Technology | Carnegie Mellon University | Berkeley University of California | ILLINOIS

Maya Prep students go on to attend their dream schools

# स्नेहबंध

**घर आजा परदेसी तेरा देस बुलाए रे**
**भूलने वाले हमको तेरी. याद सताए रे** (DDLJ)
मिनर्व्हा थिएटरमध्ये जास्त आठवडे हाऊसफुल्ल चालून 'शोले'ला मागे टाकलेल्या 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' सिनेमातलं गाणं आठवतं. त्याचबरोबर पंजाबी ठेका घेऊन आलेलं हे दुसरं गाणं आठवतं.
**ओ घर आजा परदेसी. कि तेरी-मेरी एक जिंदड़ी..** (गदर - एक प्रेमकथा)
नव्या गाण्यांपैकी खूप आवडलेलं, अतिशय अलवार असलेलं गाणं आठवतं.
**घर से निकलते ही, कुछ दूर चलते ही;**
**रस्ते में है उसका घर** (पापा कहते हैं)

...... आणि मग काळ्या-पांढऱ्या पडद्याच्या दिवसांतली गाणी आठवायला लागतात.
**घर आया मेरा परदेसी; प्यास बुझी मेरी अखियन की** (आवारा)....

एव्हरग्रीन देव आनंद आणि Ugly Duckling म्हणून सुरुवातीच्या दिवसांत हिणवली गेलेली सदाबहार नूतन यांचं अविस्मरणीय गाणं
**तेरे घर के सामने इक घर बनाऊंगा,**
**तेरे घर के सामने दुनिया बसाऊंगा** (तेरे घर के सामने) या गाण्यातला अवखळ, लडिवाळ नूतनचा अभिनय तर केवळ शब्दातीत आहे..... पानंच्या पानं लिहिली गेली आहेत त्यावर!

खूप पूर्वी कधीतरी ऐकलेल्या गाण्यांपैकी
**घर घर में दिवाली है, मेरे घर में अंधेरा** (किस्मत)
आणि
**छोटा सा घर होगा बादलों की छाँव में;**
**आशा दीवानी मन में बंसुरी बजाये** (नौकरी)
आणि
**घर आजा घिर आये बदरा साँवरिया**
**मोरा जिया धक धक रे चमके बिजुरिया** (छोटे नवाब)
अशी गाणी चुकून आठवून जातात.

आठवणींतलं घर upgrade केलं की झालेल्या बंगल्याची
**असावा सुंदर चॉकलेटचा बंगला**
इथपासूनची गाणी आठवायला सुरुवात होते.
मग त्यात **इक बंगला बने न्यारा** म्हणत कुंदनलाल सैगल येतात;
**जो मैं होती राजा तोरी दुल्हनिया** म्हणत **'ठुमक रहती राजा तोरे बंगले पे'** ठुमकणारी नलिनी जयवंत येते.

.... आणि तेच घर downgrade केलं की झालेल्या झोपडीत;
**भूमीवरी पडावे, ताऱ्यांकडे पाहावे,**
**प्रभुनाम नित्य गावे, या झोपडीत माझ्या**
असं संत तुकडोजी महाराजांसारखं भक्तिरंगात रंगायचं; किंवा
**त्या तिथे पलीकडे तिकडे,**
**माझिया प्रियेचे झोपडे**
म्हणत गदिमांच्या शब्दांत प्रेमरंगात रंगायचं.

वि. वा. लिहून गेले 'कुणी घर देता का घर? एका तुफानाला कुणी घर देता का? एक तुफान भिंतीवाचून, छपरावाचून, माणसाच्या मायेवाचून, देवाच्या दयेवाचून जंगलाजंगलात हिंडतय. जिथून कुणी उठवणार नाही अशी एक जागा धुंडतय. कुणी घर देता का घर?'

सध्या करोना (अव)कृपेमुळे 'थोडं घराबाहेर पडू द्या तर....!' असं म्हणायची वेळ आलीये.

**-- संजय मेहेंदळे**

## वकिलाचं कार्टं



२० व्या आणि २१ व्या शतकातील शिक्षण-प्रणालीमध्ये जमीन-अस्मानचे अंतर आहे. सर्व जगामध्येच ही परिस्थिती आहे. माझे शिक्षण तालुक्यातील जिल्हा-परिषद शाळेत झाले. वेगवेगळ्या विषयातील शिक्षक आपापल्या विषयात तज्ञ जरी नसले, तरी त्यांची शिकवण्याची धाटणी प्रभावित करणारी असे. आपल्याला जे ज्ञात आहे ते विद्यार्थ्यांच्या गळी उतरविण्यात त्यांचा हातखंडा असायचा. नवव्या इयतेत असतांना विज्ञान विषयात मानवी शरीर रचनेविषयी काही पाठ होते, त्यात अस्थीसंस्था, रक्ताभिसरण संस्था, पचनसंस्था, मज्जासंस्था याविषयाची त्रोटक माहिती पाठांमध्ये समाविष्ट होती.

आमचे विज्ञानाचे शिक्षक शरीर-शास्त्रात जरा जास्तीची माहिती ठेवणाऱ्यांपैकी होते. एक पाठ चार-चार दिवस घोटून घोटून शिकवायचे. विद्यार्थ्यांना आवश्यकतेपेक्षा किती तरी अधिक माहिती ते वर्गात सांगत. शरीरशास्त्र शिकविताना त्यांनी विद्यार्थ्यांना बरीच माहिती उपलब्ध करून दिली होती. विषय शिकविताना एक वेळ ते असेही म्हणाले की बेडकाच्या अंतर्गत शरीररचनेत आणि मानवाच्या अंतर्गत शरीररचनेत बरेच साम्य आहे. त्यांनी वर्गातील मुलांना आश्वासनही दिले होते की ते त्यांना बेडकाचे डिसेक्शन म्हणजे जिवंत बेडकाची अंतर्गत शरीर रचना प्रयोगशाळेत दाखवतील. त्याकरता त्यांनी दोन-तीन धीट असलेल्या विद्यार्थ्यांना मोठे बेडूक पकडून आणायला सांगितले.

त्या धिटुकल्या विद्यार्थ्यांनी काही दिवसातच खरोखर काही भले मोठे बेडूक पकडून आणले. परंतु दुसऱ्या काही विद्यार्थ्यांनी बेडकाच्या विषारी मूत्राचा माणसाला स्पर्श झाल्यास अपाय होतो असे सांगितले. त्या धिटुकल्या विद्यार्थ्यांनी मोठ्या कष्टाने पकडलेले बेडूक पुन्हा पाण्याच्या डबक्यात सोडून दिले. विज्ञानाच्या शिक्षकांना जेव्हा हे कळले तेव्हा त्यांना विद्यार्थ्यांच्या अज्ञानाविषयी वाईट वाटले. त्या बेडकाचे मूत्र मुळी विषारी किंवा अपायकारक नसतेच असे सांगून पुन्हा बेडूक पकडून आणायला सांगितले! यावेळी मात्र त्या विद्यार्थ्यांना बेडूक पकडून आणण्यात यश आले नाही.

माझा एक जिवलग मित्र सुधाकर हा वर्गात अत्यंत हुशार विद्यार्थी होता. त्याचे सामान्यज्ञान आणि वाचन अफाट होते. विज्ञान आणि गणित त्याचे आवडते विषय. जिज्ञासू वृत्तीच्या सुधाकरने मला गाठले आणि ते मला म्हणाला, "मला बेडकाची आंतररचना कशी असते हे पाहण्याची फार इच्छा आहे, आपण दोघे मिळून तुझ्या रिकाम्या खोलीत बेडकाचे डिसेक्शन करू." मी त्याला होकार दिला आणि आमची बेडकाचे डिसेक्शन करण्याची मोहीम सुरु झाली. सर्व आवश्यक वस्तूंची जमवाजमव केल्यानंतरच शाळेजवळच्या पावसाचे पाणी साचलेल्या डबक्यातून बेडूक आणून त्याचे डिसेक्शन करायचे ठरले.

डिसेक्शन करता लागणार लाकडी बोर्ड माझ्याकडे होताच, ज्याची साईझ १४" x १४" होती. बोर्ड मजबूत व त्यात खिळे सहज घुसतील असा होता. त्याची जाडीही बऱ्यापैकी होती. रविवारी डिसेक्शन करायचे ठरले. घरी कोणालाही ही बातमी सांगणे शक्य नव्हते, कारण त्याला विरोध झाला असता. सकाळीच आम्ही दोघे-तिघे शाळेकडे गेलो. मोठ्या प्रयासाने एक मध्यम आकाराचा परंतु पूर्ण वाढ झालेला बेडूक पकडला आणि त्याच्या पायाला दोरी बांधून माझ्या खोलीजवळच्या हिरवळीवर त्याला सोडले. दोरीचे दुसर टोक एका पक्क्या ठिकाणाला बांधून ठेवले. दुपारपर्यंत बेडूक बरेच सुस्त झाले होते. डिसेक्शन करण्यापूर्वी बेडकाला बेशुद्ध करणे आवश्यक होते. सुधाकरच्या मनात बेडकाला बेशुद्ध करायची योजना होती. त्याने थोडा तंबाखू घेतला, तो पाण्यात टाकून ते मिश्रण चांगले उकळून घेतले आणि थंड केले. मग बेडकांच्या तोंडात कातर घालून ती कातर बोटांनी उघडली, त्याबरोबर बेडकाचे तोंड विनासायास उघडले गेले, पेनमध्ये शाई भरण्याच्या ड्रॉपरने तंबाखूचे भरपूर मिश्रण बेडकाला पाजले. बेडूक जोरजोरात उड्या मारू लागला, पण दहा-पंधरा मिनिटात पोटात तंबाखूचे मिश्रण गेल्यामुळे शांत झाला. थोडा वेळ जाऊ दिल्यानंतर बेडकाला लाकडी बोर्डवर झोपवले. बेडूक निपचित पडून होता त्याचे चार पाय फैलावून त्यांना टोकदार पिनांनी बोर्डावर घट्ट केले. बेडकाचे पोट आकाशाकडे व पाठ बोर्डावर असल्यामुळे डिसेक्शन करण्यास सोपे होते. बेडकाचे हृदय धडधडत असल्यामुळे त्याच्या पोटाचा भाग वरखाली होत होता.

स्वच्छ केलेली दाढीची कातर सुधाकरने हातात धरली, मी बेडकाचे ढिले असलेले पोटावरील कातडे चिमटीत धरले आणि सुधाकरने हलकेच कातड्यामध्ये कातर सरकवून पोट कापायला सुरवात केली. कातर तीक्ष्ण असल्यामुळे क्षणार्धात खालपासून बेडकाच्या मानेपर्यंतचा भाग सहज कापला गेला. पोटाच्या कातडी खालील पातळ कातडीचा दुसरा थरही सुधाकरने लीलया कापला. रक्ताचा एक थेंबही न गाळता पोटावरील कातडीच पूर्ण आवरण त्याने दूर केले. आतील सगळे अवयव निसर्गनियमाप्रमाणे काम करीत होते. त्यातल्या त्यात आकुंचन-प्रसरण पाहून आम्ही तर थक्क झालो. मोठी आतडी, लहान आतडी, प्लिहा, फुफ्फुसे, रक्तवाहिन्या यांची रचना पाहून निसर्गाच्या किमयेचे आश्चर्य वाटलं. कितीतरी वेळ आम्ही बेडकाच्या अंतर्रचनेचे पर्यायाने मानवाची अंतर्रचना पाहत होतो. तीन-चार तास निरीक्षणात कसे गेले, कळले नाही. संध्याकाळी विज्ञान विषयाच्या शिक्षकाकडे जाऊन त्यांना आम्ही आमचे डिसेक्शन दाखवले, ते पाहून शिक्षक उडालेच आणि म्हणाले, "एम. बी. बी. एस दुसऱ्या वर्षाला असणारे विद्यार्थीही एवढे सफाईदार डिसेक्शन करू शकत नसावे."

संध्याकाळपर्यंत बेडकाच्या जिवात जीव होता. मात्र पांच सहा तासांनी त्याच्या हृदयाची धडधड थांबली. रात्री आम्ही बेडकाला एका गुप्त स्थानी जमिनीत पुरून ठेवले आणि पंधरा दिवसानंतर ती जागा उकरली, तेव्हा मानवाच्या अस्थी-संस्थेत असतात तशा हाडांचा सापळा आम्हाला आढळून आला.

जिज्ञासू वृत्ती असल्यास कोणालाही ज्ञान प्राप्ती करून घेण्यात कुठेही अडचण येत नाही.

**बाळकृष्ण पाडळकर**
ट्रॉय, मिशिगन
(सदर उतारा "वकिलाचं कार्ट" या आगामी आत्मचरित्रातील आहे.)

*With*
*Best Compliments*
*From*

**Prabhakar Patil**

*With*
*Best Compliments*
*From*

**Janhavi & Vikrant Patwardhan**

# Depression



Depression is growing at an alarming rate in our society. Each one of us has dealt with this at some time in our lives or with our friends and family. It is very important that we recognize it and seek help.

It happens most often between the ages of 18-25, although depression can start in kids too. There are so many reasons that a person may be depressed, such as stress, overworking, abuse, grief, low income, some prescription drugs, medical issues, alcohol and drug use, or family history.

It is more common in women than men as many of them have left their friends and family back home and find themselves lonely, lack social support, or some of them have language barriers, can't drive, or there is abuse at home. There is also some sociocultural stigma to talk about depression. Some may have quit their jobs; some can't pursue their careers. Often they have to do household chores and manage sick family members and family which can become overwhelming.

**<u>How do we recognize depression?</u>**

* feels worthless
* the person will be sleeping more
* is irritable
* fixated on past and worried about things
* absent from work/ school
* loss of sexual desire
* is angry
* has gained or lost weight
* is always tired
* has aches and pains all over
* is eating a lot or not eating at all

**<u>If these patients are not treated</u>**

•they can start having problems at work / school
•they start using drugs and start using alcohol
•become socially isolated
•they start having heart disease, diabetes, hypertension, fibromyalgia
•some may even commit suicide

**<u>Different kinds of depression</u>**

•Major depression—most common
•Bipolar—where the person can be depressed and sometimes manic
•Seasonal depression—some people feel depressed in winter
•Post-partum—after delivery

**How can we prevent depression?**

- Make sure after a good night sleep you get up every morning at the same time
- Exercise regularly (morning is better), do yoga
- Meditate
- If you believe, do some prayers
- Eat healthy—more fruits and veggies, more nuts, and less sugars, no processed fruits
- Decrease use of social media
- Taking on a new hobby
- Have fun times
- Stay away from people who make you feel depressed and take advantage of you—instead surround yourself with people who make you feel good and special
- Don’t over commit yourself
- Let it go
- Decrease alcohol intake
- Keep a positive attitude
- Do volunteering
- Think about what you are grateful for every night
- Keep positive notes (e.g., “I will be productive”)
- Reach out to your support system and therapist or a good friend and family

**Over the counter stuff you may want to try**

* Take vitamin D daily
* Omega-3 fatty acids
* Magnesium
* Lavender oil
* St. John's wort

**If you are still depressed, see your primary care doctor**

Your doctor will screen you with a PHQ2 or PHQ9 questionnaire.

Your doctor will do blood work to rule out other causes of depression, then start you on medication and see you in 4 weeks.

If you are prescribed meds, take them daily. There are a lot of medications to help combat depression nowadays—they are called SSRI, SNRI, or atypical drugs. Some of the common ones are Prozac, Lexapro, Zoloft, Wellbutrin, venlafaxine. Most medications take about 2 - 4 weeks to reach an adequate level in blood and most medicines are given for 6 months at least. If you have had a relapse, then it may be given longer or continued indefinitely. A few patients may even need to be hospitalized till they start feeling better.

Psychotherapy can help too, though the combined approach with psychotherapy and medication works the best for most patients.

**I always tell my patients to remember to take care of yourself first and that you are not alone. We are all here to help you get better.**

**Dr. Varsha Revankar, MD**

# स्नेहबंध



## सर्वदेव नमस्कारम् केशवं प्रतिगच्छति ॥



गणपती बाप्पा... आपलं सर्वांचं लाडकं आणि आराध्य दैवत...!! १४ विद्या आणि ६४ कलांचा अधिष्ठाता, विघ्नहर्ता !! चांगली बुद्धी, सुखी आणि समृद्ध आयुष्य मिळावं म्हणून आपण त्याची पूजा करतो पण त्याही पलीकडे जाऊन गणपतीचं महत्त्व आपण जाणण्याचा प्रयत्न करूया!

महर्षी वेद व्यास यांनी जेव्हा गीता लिहायला घेतली तेव्हा हे मोठं अवघड काम करण्यासाठी त्यांनी गणपतीची निवड केली. गणपतीने ती समजून लिहिली पाहिजे अशी त्यांची अट होती. पूर्णतम, पुरुषोत्तम अश्या परब्रह्माचे, श्रीकृष्णाचे संपूर्ण मानव जातीला संदेश देणारे काव्य कलियुगातील मानवी बुद्धीला कळेल अश्या भाषेत गीतेच्या रूपाने लिहिणे ही सोपी गोष्ट नव्हती. ती गणपतीने विनासायास पूर्ण केली. त्यावरून त्याचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. या अलौकिक निर्मितीसाठी गणपतीचे आपण कायम ऋणी राहू.

आपल्याकडे ३३ कोटी देव, प्रत्येकाचं वैशिष्ट्य वेगळं! पण खरा देव, परब्रह्म (Supreme Power) हा एकच आहे. बाकी सर्व देवता (Celestial Gods) आहेत. आपण कोणत्याही इष्टदेवाचे पूजन करू शकतो. पण गीतेत भगवंतांनी सांगितले त्याप्रमाणे कोणत्याही देवास तुम्ही पूजाल तरी तो मलाच येऊन मिळतो. या संदर्भातील एक संस्कृत श्लोक खूप काही सांगून जातो.

आकाशात् पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ।
सर्वदेव नमस्कारम् केशवं प्रतिगच्छति ॥

आकाशातून पडणाऱ्या पावसाचे पाणी जसे सागरालाच जाऊन मिळते तसेच कोणत्याही देवाला केलेला नमस्कार शेवटी केशवालाच जाऊन पोचतो. केशव, माधव, कान्हा, श्रीकृष्ण अश्या अनेक नावाने ओळखला जाणारा हा सगुण साकार परब्रह्माचा अवतार! काय आहे याचे महत्त्व? याच उत्सुकतेपोटी मी गेल्या वर्षी MMD च्या अध्यक्षपदाची सूत्रे मंजिरीकडे सोपविल्यानंतर अध्यात्मिक वाचनास सुरुवात केली. पँडेमिकची संधी साधून गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध, प्रेमरस सिद्धांत, रूपध्यान यांसारखी अनमोल रत्ने वाचून नोट्स काढल्या, lectures ऐकली तेव्हा असं वाटायला लागलं कि आपल्या संतांनी ५००० वर्षांपासून मानवी जीवनाचं महत्त्व समजावून सांगितलंय आणि इतकी वर्ष आपण ते जाणून घेण्याचा प्रयत्नही केला नाही. शाळेत असताना गीता अध्याय नुसतेच तोंडपाठ केले पण त्याचा अर्थ कधी कळलाच नाही. जसे चर्चमध्ये दर रविवारी bible शिकवतात तसेच आपण गीता का शिकलो नाही. जेवढ्या लौकर आपण शिकू तेवढ्या लौकर ते आपण जीवनात वापरू शकू.

काय आहे मानवी जीवनाचं रहस्य? काय होतं आपलं मृत्यूनंतर? संपूर्ण मानवजात सतत कशाच्या तरी मागे धावत असते. परिपूर्ण आणि चिरंतन आनंदासाठी! आपण पाहतो पैशाने काही हा आनंद मिळू शकत नाही. मग कुठे आहे हा चिरंतन आनंद? कुणाला मिळालाय हा सुखी माणसाचा सदरा? संत कबीर, मीराबाई, तुकाराम, गोरा कुंभार, भक्त प्रल्हाद, अर्जुन या सर्वांना हा खजिना जिवंतपणीच प्राप्त झाला. त्यांनी देवाजवळ भैतिक सुखाच्या मागण्या केल्या नाहीत तरीही त्यांना चिरंतन आनंदाचा ठेवा मिळाला. भीमसेन जोशींनी गायलेल्या अभंगात म्हटलंय "जो भजे हरी को सदा, वोही परम पद पावेगा"

गीतेत भगवंतांनी सांगितल्याप्रमाणे देव भाव भक्तीचा भुकेला आहे त्यामुळे मनाने केलेली श्रद्धायुक्त भक्ती, प्रेम आणि पूर्ण शरणागती ही भगवंताला प्रिय आहे. जितकी शुद्ध, निष्काम आपली भक्ती आणि पूर्ण शरणागती तेवढेच प्रेम भगवंत आपल्या भक्तावर करतो! प्रत्येक मनुष्य कळत नकळत माझ्याच मार्गावर येतो, हे पार्था ...!

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् |
मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्या: पार्थ सर्वश: || (भगवत गीता, अध्याय ४, श्लोक ११)

**-- भारती मेहेंदळे**

(For detail Gita Study follow https://www.holy-bhagavad-gita.org/)




No matter the destination, choose
Jaya Travel for all your travel needs.

5% OFF on any Cruise or Tour Package base fare*

*Restrictions may apply

*Call Jaya Travel to book today!*

877-359-5292 | JAYATRAVEL.COM | letsgo@jayatravel.com

JAYA TRAVEL & TOURS


श्री गणेश
STAY SAFE!
महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट
एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ